६ जातीस सरंजाम गांव येविसी.

२ मौजे भोसे तर्फ चाकण प्रांत जुन्नर येथील दरोबस्त अंमल जातीस येविसी.

१ मोकदम मौजे मजकूर यांस सनद.

१ जमीदार तर्फ मजकुर यांस पत्र.

२

४ पालखीचे सरंजामास गांव येविसी.

१ मौजे रोटवद परगणे जळोद येथील दरोबस्त अंमलापैकीं निमे अंमल येविसी मोकदम यास.

३ मौजे मुंडी परगणे डांगरी येथील मोकासाखेरीज करून दरोबस्त अमलापैकीं निमे अमल येविसी.

१ मोकदम मौजे मजकूर यास सनद.

१ जमीदार परगणे मजकूर यांस पत्र.

१ कमावीसदार दिमत बाळाजी जनार्दन यांस कीं, मौजे मजकूरचा सदरहू अंमल मशारनिल्हेचे हवालीं करणें. हे अंमल करितील ह्मणोन सनद.

३

४

६

९ इनाम गांव व जमीनी सरकारांत जप्त करून जप्तीची कमावीस मशारनिल्हेकडे सांगोन गांवचा व जमीनीचा ऐवज बाळाजी जनार्दन यांचे स्त्रीकडे खर्चास देविला येविसी.

२ मौजे वाकसई तर्फ नाणें मावळ येथील दरोबस्त अंमलापैकीं निमे अमल येविसी.

92. Balaji Janardan Fadnis having died, his Saranjam Inam villages, and lands were handed over for management to Baloji Kunjar.

A. D. 1800-1801.

NATIONAL ARCHIVES OF INDIA

१ मोकदम मौजे मजकूर यास सनद.
१ जमीदार तर्फ मजकूर यांस पत्र.

२

५ संमत हवेली प्रांत वाईपैकीं.

मौजे मेणवली येथील	जमीन	चावर
दरोबस्त अमल १	कसबे बावधन पैकीं	·॥·
	मौजे कपूरपैकीं	·।·
	मौजे येकसरपैकीं	·॥·
		१॥

येकूण येक गांव दीड चावर जमीन येविसी. सनदा.
४ मोकदम देहाय यांचे नांवें
१ जमीदार प्रांत मजकूर यांस. पत्र.

५

९ (कांहीं चूक आहे.)

२ कुरणाविसी मोकदम यांस सनदा.
१ मौजे पाडळी तर्फ खेड प्रांत जुन्नर येथील कुरण येविसी.
१ कसबें चाकण तर्फ मजकूर प्रांत जुन्नर येथील शिवेचें कुरण येविसी.

२

१७ रसानगी चिंतो वामन कारकून निसबत दप्तर.

९३।११९ बाळोजी कुंजीर यास पेठ सदाशिव शहर पुणें येथें बाळाजी जनार्दन फडणीस यांजकडील वाडा सरकारांत जप्तीस आहे, तो हल्लीं राहण्याकरितां दिल्हा आहे. त्यास वाड्यानजीक पाण्याचा हौद आहे, त्या नहरापैकीं हाताचे करांगुलिपुढील पेराचे बेताप्रमाणें पाणी मशार निल्हे यास देविलें असें. तरी सदरहू करांगुलीचे बेताप्रमाणें नहरास तोटी लाऊन नहर बांधून वाड्यांत पाणी नेतील त्यास नेऊं देणें. ह्मणोन आपाजीराम कमावीसदार पेठ मजकूर यांचे नांवें. सनद १.

इ. स. १८००–०१ इह्दि मया तैन व अलफ; जमादिलावल २१.

रसानगीयाद.

९४।१३९ श्री भीमाशंकर देव यांचें देवालयाचें काम बाळाजी जनार्दन यांनीं ला-

93. A house in Sadashiv Peth belonging to Balaji Janardan Fadnis, which was attached by Government was given for residence to A. D, 1800 1801. Baloji Kunjir and permission was accorded to his conveying water by means of a pipe of the circumference of a finger out of the cestern adjoining the house.

NATIONAL ARCHIVES OF INDIA

इ० स० १८०१–०२ इसने मया तैन व अलफ. सवाल १७.

विलें होतें. त्यास देवालयाचें काम पानापर्यंत होऊन शिखराचे पांच सात थर तयार झाले आहेत. पुढें शिखराचें काम कळस पावेतों करावयाचें ह्मणोन अंताजी येशवंत बाळाजी जनार्दन यांजकडून देवालयाचें कामावर आहेत, त्यांणीं हुजूर विदित केलें. त्यास देवालयाचें काम जाहलें पाहिजे याजकारितां देवालयाचें कामास रुपये ५०००० पन्नास हजार रुपये चांदवड धोंडो बल्लाळ मामलेदार किल्ले लोहोगड यांसी सांगोन सदरहू ऐवज बाळाजी जनार्दन यांचे ऐवजा-पैकीं अंताजी येशवंत याजकडे मशार निल्हेकडून देवणें. ह्मणोन सदाशिव नारायण याचें नांवें.

सनद १.

रसानगीयादी.

बाळोजी कुंजीराच्या कीर्दीपैकीं.

९५।१४७ बाळाजी जनार्दन यांजकडे तुह्मांकडून गांव चालत आहेत. त्यांस ते मृत्यु पावले. सबब त्यांचे स्त्रीकडे सदरहू गांव सरकारांतून दिल्हे असतां तुह्मीं त्यांजकडे चालवावयासी दिकत करतां, ह्मणोन हुजूर विदित जाहलें. त्याजवरून हें पत्र सादर केलें असें. तरी सदरहू गांव बाळाजी जनार्दन यांजकडे चालत आल्याप्रमाणें मशार निल्हेचे स्त्रीकडे चालविणें. ह्मणोन चिटणीसी.

इ० स० १८०१।०२ इसन्ने मया तैन व अलफ, सफर २.

पत्रें.

१ काशीराव होळकर यांजकडून देहें बितपशील.
३ मौजे कोन्हाळे वगैरे देहें तीन परगणें रावेर.
१ मौजे रुई तर्फ कोन्हाळें.

४

चार गांव चालवावयाविसीं. पत्र.

१ नरसो खंडेराव यांजकडून देहे बितपशील.
१ मौजे पंचाळें.
१ मौजे निंबगांव.
१ मौजे भोंकणी.
१ सुलतानपूर.
१ मौजे शाहापूर.

५

94. Balaji Janardan had commenced the construction of the temple of Shri Bhima Shankar. The work was not completed when Balaji Janardan died. Sanction was given to spend Rs. 50000 out of Balaji Janardan's property for completing the work.

A. D. 1801-1802.

95. Kashirao Holkar, Pratinidhi, Baburao Angria, the Subhedar of Khandesh, Daulatrao Scindia, and others were directed to continue to Balaji Janardan's widow the villages held from them by Balaji Janardan as already ordered by Government.

A. D. 1801-1802.

NATIONAL ARCHIVES OF INDIA

पांच गांव तर्फ देपूर पैकीं आहेत, ते चालवावयाविसी पत्र.
१ परशुराम पंडित प्रतिनिधी यांस कीं, आपणाकडून देहेंबितपशील.
८ प्रांत वाई.
१ मौजे किराडे.
१ मौजे वडवली.
१ मौजे भिवंडी.
१ मौजे सोनगांव, संमत निंब.
१ मौजे बसली.
१ मौजे कोंढवळें.
१ मौजे रेणवळें.
१ मौजे कवठें.
८
१ मौजे वासे तर्फ वंदन.
१ मौजे सरज्यापूर, तर्फ कुडाळ.
१ मौजे जांभळी, तर्फ जोरखोरें.
११

आकरा गांव आपलेकडील कमाविसदार चालवावयाविसी दिकत करितात म्हणोन निवेदन जाहलें. त्याजवरून हें पत्र आपणांस लिहिलें असे, तरी सदरहू आकरा गांव बाळाजी जनार्दन यांजकडे चालत आल्याप्रमाणें मशारनिल्हेचे स्त्रीकडे चालवावें म्हणोन.
१ बाबुराव आंगरे वजारतमहा सवाई सरखेल यांजकडून देहें वगैरे इनाम आहेत. बितपशील.
३ तर्फ बोरेटी.
१ मोजे खारोळी.
१ मौजे देवखेड.
१ मौजे भांदूस.
३
१ मौजे वावे तर्फ ब्राह्मणगांव.
१ मौजे गदल तर्फ चेऊल.
१ कसबे चेऊल येथील वाडी.
१ मौजे नितनळे तर्फ तळोजे तालुके नेरल.
७

देहे साहाववाडी येक चालत आहे त्यांस ते मृत्यु पावले सबब त्यांचे स्त्रीकडे सदरहू गांव व वाडी सरकारांतून दिल्ही असतां तुह्मी अडथळा केला आहे. म्हणोन हुजूर विदित जाहलें. त्याजवरून हें पत्र लिहिलें

NATIONAL ARCHIVES OF INDIA

असें. तरी सदरहू सहा गांव व येकवाडी बाळाजी जनार्दन यांजकडे चालत आल्याप्रमाणें मशार निल्हेचे स्त्रीकडे चालवावें ह्मणोन पत्र.

१ रामचंद्र बल्लाळ यांस कीं, संस्थान पेठ परगणे मजकूर येथील जप्तीचें काम सरकारांतून तुह्मांकडे सांगितलें आहे. त्यास मौजे जांबविहीरे, व मौजे भड, परगणे मजकूर हे दोन्ही गांव संस्थान मजकुरचे राजाकडून बाळाजी जनार्दन यांजकडे चालत आहेत त्याविसी.

१ व्यंकटराव नारायण सरसुभा प्रांत खानदेश यांस कीं, मौजें कोन्हाळें वगैरे देहें ३ प्रांत खानदेश हे गांव काशीराव होळकर यांजकडून बाळाजी जनार्दन यांजकडे चालत आहेत. त्यास ते मृत्यु पावले सबब त्यांचे स्त्रीकडे सदरहु गांव सरकारांतून दिल्हे असतां त्यांजकडे चालवावयाविसी होळकर दिकत करतात. त्यास तुम्ही गांवचा ऐवज वसूल करून मशारनिल्हेचे स्त्रीकडे देणें ह्मणोन.

१ मल्हार धोंडदेव दिंमत दौलतराव शिंदे अलीजाबहादर यांस कीं, निंबालकर यांजकडून बाळाजी जनार्दन यांजकडे जहागिरीचे अमलाचे गांवतर्फ पेडगांवपैकीं बितपशील.

१ मौजे खडकें.
१ मौजे खंडाळें.
१ मौजे दसर्मगव्हाण.

३

येकूण तीन देहे येथील जहागिरीचा अमल सरकारांतून दिल्हा, त्यास तुम्ही जहागिरीचा अंमल कचेरींत घ्यावा असें म्हणता, ह्मणोन हुजूर विदित जाहलें, त्याजवरून हें पत्र केलें असे, देहे मजकूरचे जहागिरीची वहिवाट पेशजीपासून सुदामत बाळाजी जनार्दन यांजकडे चालत आल्याप्रमाणें त्यांचे स्त्रीकडील कमाविसदार वहिवाट करून किल्ले नगर येथील अंमल सदरहू गांवीं असेल, त्याप्रमाणें पावता करतील. तुम्ही दिकत न करणें ह्मणोन पत्र.

७

बाळोजी कुंजीरच्या कीर्दीपैकीं.

९६।१४८ बाळाजी जनार्दन फडणवीस यांनीं श्रीकाशी नजीक कर्मनाशी नदीचें पुलाचें कामाबद्दल बैल खरेदी केले होते. त्यास ते हल्लीं पुणीयास सरकारांतून आणविले असत, तरी भिकाजी अनंत श्रीकाशीस अन्नछत्राचे कामावर आहेत.ते काशीहून बैल तुम्हांकडे

इ. स. १८०१–०२. इसने मयातैन व अलफ. जमादिलावल २९

96. Balaji Janardan Fadnis had purchased some bullocks for use on the work of constructing a bridge over the river Karmanashi near Benarus The bullocks were now ordered to be brought to Poona.

A. D. 1801-1802.

NATIONAL ARCHIVES OF INDIA

पाठवितील त्यांचे चंदी वैरणीची बेगमी करून माणसें बरोबर देऊन पुणीयांत पावतें करणें, म्हणोन कारकून दिमत बाळाजी गोविंद याचें नांवें छ २९ जमादिलावल

सनद. १

९७।१७० पेठ सदाशिव शहर पुणें येथें बाळाजी जनार्दन यांज-
इ. स. १८०३-०४ आर्बा मयातैन व अलफ. जिल्हेज १४ कडील पागेची जागा सरकारांत आहे, त्यापैकीं जागा मोजणी गुजारत एलपा वलद मल्हारजी गवंड्या पंधरा तसूंचे हातें हात सुमारें.

× × × × ×

येकूण दोन जागांपैकीं येक जागा लांबी एकशें साडे अठरा हात व रुंदी पावणे अठावीस हात, व दुसरी जागा लांबी सवाएकूणहात्तर हात व रुंदी सवातीस याप्रमाणें भितीचे इमल्यासुद्धां विठ्ठल विश्वनाथ पटवर्धन कारकून शिलेदार यांस घर बांधोन रहावयाकरितां बक्षीस देविली असे. तरी सदरहू जागा वर चतुःसीमा लिहीली आहे, त्याप्रमाणें मशारनिल्हेचे हवालीं करणें. हे या जाग्यांत घर बांधोन राहतील म्हणोन विठोबा गायकवाड कमाविसदार पेठ मजकुर यांचे नांवें.

सनद. १

रसानगी यादी.

९८।१८२. बदल देणें, जिऊबाई भानु, बाळाजी जनार्दन यांची स्त्री यांस
इ. स. १८०४-०५. खमस मयातैन व अलफ, रबिलावल २९. सालीना नेमणूक बारा हजार रुपये त्यांपैकीं तूर्त खर्चास रसानगीयाद ३००० रुपये.

तीन हजार रुपये तालुके वसई, निसबत खंडेराव निळकंठ यांजकडे, सालमजकुरचे रसदेचा ऐवज येणें त्यापैकीं देविले.

राजकीय (ब) इतर माहिती.

—:०*०:—

(१३) मोरो बाबूराव फडणीस.

इ. स. १७९७-९८. समान तीसेन मया व अलफ, जनादिलावल ९. ९९।१५२. मोरो बाबुराव यांस किल्ले रतनगड येथें ठेविलें सबब बंदोबस्तास ज्यास्ती लोक ठेवावे त्याविसी वगैरे. कलमें लोक असामी २०० दोनशें जदीद ठेवावे. किल्ले मजकुरीं माचीस मशारनिल्हेस व लो-कांस रहावयास घर व अलंगा पाहिजेत, त्यांचा शेरा तालुके त्रिंबक येथील लोकांचे

97. A portion of Site in Sadashiv Peth of Poona used for Balaji Janardan's horse, was now given to Vithal Vishwanath Patwardhan.

A. D. 1803-1804.

98. Jiubai widow of Balaji Janardan Bhanu was given an allowance of Rs. 12000 a year.

A. D. 1804-1805.

99. Moro Baburao was kept in the fort of Ratangad and additional men were appointed for his safe custody.

A. D. 1797-98.

NATIONAL ARCHIVES OF INDIA

शेऱ्याप्रमाणें, दरमहा दर असामीस सरासरी सेहा रुपये प्रमाणें छ० २५ मोहरमपासून लोक ठेवून त्यांजपासून चाकरी घेऊन रोजमेर वगैरे तालुके मजकुरचे शिरस्ते बमोजिब देऊन हिशेबीं खर्च लिहिणें. कलम १ खुद मोरोबाबुराव यांजकडील भोजनखर्च, व वस्त्रें, व औषधें, वगैरे मिळोन किल्ले अहमदनगर येथें सालांत रुपये ३००० तीन हजार खर्च होत होता त्या अन्वयें खर्च करून हिशेबीं लिहिणें मजुरा पडेल. कलम १.

त्यांचें काम करावयास येकसाला अजमासें रुपये १५०० दीड हजार पावेतों चौकसीनें खर्च करून घर व अलंगा तयार करून ऐवज हिशेबीं खर्च लिहिणें. कलम १

येकून तीन कलमें, लिहिलीं असेत, तरी सदरहूप्रमाणें वर्तणूक करणें म्हणोन येशवंतराव महादेव यांचें नांवें सनद १.

रसानगी मोरो त्रिंबक गडबोले.

१००।५८ राजश्री मोरो बाबुराव फडणीस यांस सरकारांतून कैद करून तुमचे हवालीं केलें आहेत. त्यांस त्यांची कैद हल्लीं मोकळी करून ही सनद तुम्हांस सादर केली असे, तरी मशारानिल्हेस मोकळें करणें. चौकी पहाऱ्यास प्यादे तुह्मांकडील आहेत ते त्यांनीं ठेऊन घेतल्यास ठेवणें. बाहेर कोठें गेलें आल्यास व त्यांजकडे कोणी गेल्यास मनाई न करणें. प्याद्यांनीं त्यांचे रजातलबेंत राहवें म्हणून ताकीद करणें, आणि कैद मोकळी झाली म्हणोन मशारनिल्हेचे हातचे पत्र हुजूर पाठऊन देणें. म्हणोन धोंडो महादेव यांचे नांवें सनद १.

इ. स. १७९७–९८
समान तिसेन मया व अलफ;
साबान २६

परवानगी रुबरू.

जमा जामदारखाना.

१०१।११३ कमावीस भेट, राजश्री आपासाहेब यांसी बदल राजश्री मोरो बाबूराव फडणीस यांचे घरीं श्रीगणपतीचे उच्छाहानिमित्त स्वारी रात्रीस कीर्तनास गेली. ते समयीं पोशाक दिला. तो गुजारत लक्ष्मण जोरी खिजमतगार सनगें येकूण.

इ० स० १८०१–०२
इह्दि मया तैन व अलफ;
रबिलाखर. ६

	रुपये.
४० तिवट धुवट जैनाबादी.	१
१५० दुपटा काशीचा सफेत कोरा.	१
३० झगा धुवट.	१
५० तुंबा किनखाबी लाल सुरती अस्तर गुलबादल पिंवळें समेत नाडी रेशमी जाळीदार.	१
२७०	४

A. D. 1797-98. 100. Moro Baburao Fadnis was now set at liberty.

A. D. 1801-1802. 101. Appasaheb went to Baburao Fadnis' house during the Ganpati festival.

NATIONAL ARCHIVES OF INDIA

राजकीय (ब) इतर माहिती.

(१४) त्रिंबकराव पेठे.

किरकोळी रुपये.

१०२।२१४—१००० त्रिंबकराव अमृतेश्वर पेठे यांणीं सरकारांत लिहून दिल्हे कीं, मजपासून स्वामीचे सेवेसी अंतर पडोन महत अपराध घडला. त्याजवरून स्वामीचा रोष होऊन जातीस व फौजेच्या खर्चास सरंजाम सरकारांतून होता तो व इनाम गांव जमीनीसुद्धां कुल सरकारांत घेतला, हें योग्य केलें. सेवकाचा आब न घेतां घरीं बसून स्वस्थ राहावें फंद फितूर या उपर करूं नये ऐशी आज्ञा झाली. त्याजवरून आज्ञेप्रमाणें आपले घरीं पुण्यांत स्वस्थ बसलों. कुटुंबाचा योगक्षेम चालला पाहिजे म्हणोन स्वामींचे सेवेसी विनंति केली. स्वामीनीं आज्ञा केली कीं, तुम्हांकडे सरंजाम फौजेचे खर्चास व जातीस व इनामगांव व जमीनी वगैरे जें काय सरकारांतून व परभारें चालत होतें तें सरकारांत द्यावें; असें तुम्हांस पतकरल्यास दोन हजार रुपये दरसाल तुम्हांस कुटुंब सुद्धां सालबेगमीचे खर्चास सरकारांतून पावत जातील. ते तुम्हीं घेऊन सरकार चाकरी येकनिष्ठेनें करावी. फंदफितुर करूं नये. सरकारचाकरी सोडून स्वराज्यांत व परराज्यांत कोठें चाकरीस राहूंनये म्हणोन आज्ञा केली. ते मी आपल्या स्वसंतोषें कबूल करून हें विनंतीपत्र सेवेशीं लिहून दिल्हें आहें. स्वामींचे राज्यांत लहानमोठे सरदार आदिकरून कोणाशींही व परदौलतींत कांहीं एक राजकारण व फंदफितूर करणार नाहीं. मजकडे फौजेच्या खर्चास व जातीस सरंजाम व इनाम गांव जमीनी वगैरे जें काय सरकारांतून व परभारें चालत होतें तें सर्व सरकारांत ध्यावें त्याजविसीं जातीनें व दुसरे यांजकडून रदबदलीची विनंति होणार नाहीं. दरसाल दोन हजार रुपये कूल पडले पानप्रपंचाचे खर्चाची नेमणूक सालबेगमीची सरकारांतून करून दिल्ही आहे, ती घेऊन आपला प्रपंच करून स्वामींचे पायांपाशीं राहून येकनिष्ठेनें चाकरी करीन. दुसरे कोणाची चाकरी करणार नाहीं. म्हणोन माघ शुद्ध नवमी शके १७२९ प्रभव नाम संवत्सरेचे मितीचें पत्र पेठ्ये यांणीं सरकारांत लिहून दिल्हें तें जवाहिरखान्यांत ठेवावयास रघुनाथ सदाशिव शेंडे कारकून निसबत दप्तर यांचे हवालीं केलें. त्यास त्रिंबकराव अमृतेश्वर पेठ्ये यांस सालीना जातीस व कुटुंबाचे व घोडीं व पालखी व उंटें वगैरे बिलकूल खर्चास दोन हजार

इ० स० १८०७-०८
समान मया तेन व अलफ.
रबिलाखर ६.

102. Trimbak Amriteshwar Pethe having acted treacherously against the Peshwa, his Saranjam and Inams were attached. He now prayed that provisiou might be made for his maintenance. He was allowed an allowance of Rs. 2000 a year, all his Saranjam and Inam being surrendered to Government. He was enjoined to enter into no canspirecy wether in the Government territory or in the foreign states and to serve Government with loyalty.

A. D. 1807-1808.

MAHARASHTRA STATE ARCHIVES GOVT. OF INDIA

रुपये द्यावयाचे करार केले. त्यापैकीं रसानगी यादी छ १७ मोहरमीं तालुके आमदाबाद प्रांत गुजराथपैकीं देविले. रुपये १०००.

---

१ राजकीय (ब) इतर माहिती.

(१५) निंबाळकर.

१०३।१०७ आपाजीराव मोरे यांचे नांवें सनद कीं, तुह्मांकडे सरलष्करचें पद सांगितलें होतें, त्यासंबंधें फौजेचे बेगमीस सरंजाम चालत होता. त्यास हल्लीं तुह्मांकडून सरलष्करचें पद व सरंजाम दूर करून सिदोजीराव नाईक निंबाळकर यांजकडे सरलष्करचें पद सांगोन त्यासंबंधें फौजेचे बेगमीस सरंजाम पेशजीप्रमाणें पेस्तरसाल सन आर्बा मयातैनापासून करार करून देऊन हे सनद तुह्मांस सादर केली असे. तरी महालचीं ठाणीं जकिरा-सुद्धां व हत्ती व घोडीं व उंटें व नगारखाना वगैरे सरकारचे शिलकी दागीने सरलष्करचे पदासंबंधें तुह्मांकडे असतील ते मशारलिल्हेचे हवालीं करून कबज घेणें ह्मणोन. सनद १ रसानगीयादी एकंदर.

इ. स. १८०२–०३ सलास मयातेन व अलफ; सफर १४

---

१. राजकीय (ब) इतर माहिती.

(१६) त्रिंबकजी डेंगळे.

१०४।२१५ मुकाम सातारा येथील कामकाज कृष्णराव नारायण यांजकडे होतें तें दूर करून सालमजकुरीं त्रिंबकजी डेंगळे यांजकडे सांगितलें येविसी सनदा.

इ. स. १८०८–०९ तिसा मयातेन व अलफ; जमादिलाखर २७

१ त्रिंबकजी डेंगळे यांस कीं, इमानें इतबारें वर्तोन मुकाम मजकूर येथील बेगमीचे गांव वगैरे सुद्धां अंमल चौकशीनें करून जमाखर्चाचा बेहेडा अलाहिदा करून दिल्हा जाईल त्याप्रमाणें वर्तणूक करणें. व मुकाम मजकुरीं निसबतवार बाकी येणें असेल त्याची रुजुवात करून घेणें व डौलाची शिक्केकटार कृष्णराव नारायण यांजवळ आहे ते त्याजपासून घेणें ह्मणोन सनद.

---

103. The dignity of Sir Laskar together with the Saranjam, connected there with, was taken from Appajirao More and conferred on Sidojirao Naik Nimbalkar.

A. D. 1802-1803.

104. Trimbakji Dengle was appointed to manage the affairs at Satara, displacing Krishnarao Narayen.

A. D. 1808-1809.

NATIONAL ARCHIVES OF INDIA

१ कृष्णराव नारायण यांस कीं, मुक्काम मजकूर येथील कामकाज मशारनिल्हे करतील, डौलाची शिक्केकटार तुम्हांजवळ आहे ते यांचे हवालीं करून कबज घेणें, व मुक्काम मजकुरीं निसबतवार वगैरे बाकी येणें असेल त्याची रुजुवात करून देणें. म्हणोन सनद.

२

रसानगी यादी.

---

१ राजकीय (ब) इतर माहिती.

(१७) बापू गोखले.

१०५|२००. देणें बापुजी गणेश गोखले, यांस वाई प्रांतीं बंडाचा उपद्रव जाहला सबब बंदोबस्तास पाठविलें. त्यांस निरोप समयीं विद्यमान राजश्री बाबासाहेब शुक्रवारचे वाडयांत रुबरु पाहून दिल्हा. शिरपेंच घाट साधा तीन फुलांचा, बद्दल जनराल वसली (जनरल वेलस्ली) दिमत इंग्रज कलकत्तेकर पैकीं. किंमत रुपये.

इ० स० १८०६-०७. सबा मयातैन व अलफ. सवाल १५.

२६० बरहुकूम दाखला.
२८० जाजती, येकसाला.

५४०

शहत

७१ हिरे व हिरकण्या किंमत रुपये ४४२॥
१ पांचमणी लोलक वजन रती ७८/८
दर ६ प्रमाणें किंमत रुपये ४२|||.
० सोनें व अजुरा किंमत रुपये ९४|||.

७२

जडाव दागिना १

१०६|२२६ बापूजी गणेश यांचें नांवें सनद कीं, तुम्हां समागमें सरकारची नेम-

---

A. D. 1806-1807. 105. A present of jewels was made to Bapuji Ganesh Gokhale on the eve of his departure to Wai to quell a disterbance.

A. D. 1810-11. 106. Bapuji Ganesh was directed to disband from the begining of the current year half the Government army that was under his command.

NATIONAL ARCHIVES OF INDIA

इ० स० १८१०–११ इहिदे अशर मयातैन व अलफ जमादिलावल १५.

णुकी फौज व गाडदी वगैरे लोक आहेत. त्यांपैकीं निमे लोकांस साल मजकूर अवल सालापासून निरोप द्यावयाची आज्ञा करून हे सनद सादर केली असे. तरी सदरहूप्रमाणें निमे लोकांस निरोप सालमजकूर अवल सालापासून देणें म्हणोन. सनद १.

रसानगी यादी.

राजकीय. (ब) इतर माहिती.

(१८) कोल्हापुरचे राजे.

१०७।६७ तालुके देवगड येथें करवीरकर व बावडेकर रोखे करून दंगा करितात. त्यांचे बंदोबस्तास नवे लोक ठेवावयाची आज्ञा जाहली पाहिजे, म्हणोन तुम्हीं विनंतीपत्र पाठविलें त्याजवरून हे सनद सादर केली असे. तरी तीनचारशें माणूस काम जरूराती लागल्यास महालचे शेऱ्याप्रमाणें जदीद ठेवून बंदोबस्त चांगला राखणें. काम जाहल्यावर सदरहू लोक दूर करणें. म्हणोन गंगाधर बचाजी यांचे नांवें. सनद.

इ० स० १७९८–९९ तिसा तिसेन मया व अलफ मोहोरम १५.

रसानगी, गोविंदराव भगवंत पिंगळे.

१०८।७२ तालुके रत्नागिरी येथें बावडेकर आमात्य यांजकडील लोक येऊन दंगा करितात. त्यांचे बंदोबस्तास कांहीं जदीद शिबंदी ठेवावयाची आज्ञा जाहली पाहिजे. म्हणून त्याजवरून जदीद लोक असामी १५० महालचे शेऱ्याप्रमाणें ठेवावयाची आज्ञा करून हे सनद सादर केली असे; तरी सदरहू दीडशें माणूस चांगले ठेवून बंदोबस्त करणें. काम जाहल्यावर सदरहू लोक दूर करणें. म्हणून लक्ष्मणराम याचे नांवें. सनद.

इ० स० १७९८।९९ तिसा तिसेन मया व अलफ सफर १४.

रसानगी यादी.

१०९।७७ धोंडो बल्लाळ यांचे नांवें कीं, करवीरकर यांणीं सरकारचे महाल व किल्ले दाबिले आहेत. ते सरकारांत द्यावयाची मसलत व महालानिहाय प्रांत कर्नाटक येथील बंदोबस्त मोरो बापूजी यांजकडे सांगितला असे. तरी तुम्हीं फौज वगैरे सरंजामसुद्धां मशारनिल्हेकडे जाऊन फौ-

इ० स० १७९८–९९ तिसा तिसेन मया व अलफ जमादिलावल १८.

197. Additional men were permitted to be entertained at Taluka Deogad in consequence of the disturbances created by the Raja of Kolhapur and the Bawdekar.

A. D. 1798-99.

108. Additional men were permitted to be entertained at Taluka Ratnagiri, in consequence of the disturbances created by the men of Bawadekar Amatya.

A.. D. 1798-99.

109. Moro Bapuji was deputed to recover the Government Mahals and forts usurped by the Kolhapur Raja. Dhondo Ballal was directed to place his army at his disposal.

A. D. 1798-99.

NATIONAL ARCHIVES OF INDIA

जेची हजिरी गणती घेऊन कामकाज सांगतील त्याप्रमाणें करीत जाणें. व महालानिहाय तपे तेगूरसुद्धां ठाणीं तुह्मांकडे असतील तीं जकिरासुद्धां मशारनिल्हेचे हवालीं करून कबज घेणें. ह्मणोन छ १ जमादिलावल.

सनद १.

रसानगी यादी.

११०।० महाराज राजश्री छत्रपति स्वामी करवीरकर यांजकडील सरंजाम चिकोडी व मनोली व फुटगांव जे तुह्मांकडे असतील ते सखाराम घाटगे सर्जेराव यांजकडील कमाविसदाराचे स्वाधीन करणें. ह्मणून रामचंद्र परशुराम यांचे नांवें चिटणीसी पत्र १.

इ० स० १८००–१ हिंदे मयातेन व अलफ रबिलाखर १०.

१११।१३४ बावडेकर वगैरे सरकार तालुक्यांत उपद्रव करितात. त्यांचे पारिपत्यास पेशजी सरकारांतून फौजा रवाना जाहल्या. तेव्हां सुरळीतपणें जाबसाल लाऊन फौजा माघाऱ्या आणविल्या. त्यांस सालमजकुरीं तें कांहींच मनांत न आणितां सरकार तालुक्यांत दंगा करितात. यास्तव त्यांचे पारिपत्यास सरकारांतून सरदार मोठा माणूस फौजा बरोबर देऊन रवाना होत आहे. तरी तुम्हांकडील लोक बरकदाज हेटकरी व पटेकरी व जेजाल बारदार जेजालासुद्धां माणूस चांगले चिलखी (उत्तम) नेमणूकी भरण्यापैकीं तयार लेश, पोटाची व दारुगोळीची पोक्त बेगमी करून खंडेराव निळकंठ निसबत सरसुभा प्रांत कोंकण हे तुम्हांस लिहितिले तेथें लोक रवाना करणें. लोकांची हजिरी रुबरु पाहण्यांत येईल. ह्मणोन किल्ले व तालुकेहाय प्रांत कोंकण येथील मामलेदार यांचें नांवें.

इ० स० १८०१–०२ इसन्ने मया तैन व अलफ; जमादिलाखर २

सनदा.

१ किल्लेहाय तालुके वसई, निसबत केशवराव जगन्नाथ पैकीं लोक ५०० पांचशें येविसी. सनद.

१ किल्लेहाय तालुके रत्नागिरी, निसबत भास्कर जगन्नाथ पैकीं लोक असामी २०० सनद.

१ तालुके विजयदुर्ग, निसबत आबाजी बापूजी पैकीं लोक असामी २०० दोनशें येविसी. सनद.

१ किल्लेहाय प्रांत कल्याण भिंवंडी, निसबत नारो बल्लाळ पैकीं लोक असामी १५० दिडशें येविसी. सनद.

110. Ramchandra Parasharam was directed to hand over to Sakharam Ghatge Sarjerao, the villages of Chikodi, Manoli and any other villages belonging to the Maharaja of Karvir which were under his management.

A. D. 1800-1801.

111. The Bawadeker and others having formerly made raids on Government territory, an army was sent against them. They then came to terms and the army was recalled. They however again began to give trouble and an army was proposed to be sent against them. The Mamlatdars of Konkan were directed to send their men to join the army.

A. D. 1801-02.

NATIONAL ARCHIVES OF INDIA

१ तालुके सुवर्णदुर्ग, निसबत बाळोजी कुंजीर पैकीं लोक असामी २०० दोनशें येविसी. सनद.

१ किल्लेहाय प्रांत राजपुरी, निसबत आपाजी रामचंद्र पैकीं लोक असामी १०० येकशें येविसी. सनद.

१ तालुके अवचितगड बिरवाडी, निसबत कृष्णाजी बल्लाळ पैकीं लोक असामी ७५ पाऊणशें येविसी. सनद.

१ तालुके उंदेरी, निसबत आपाजी बापूजी व महादाजी निळकंठ पैकीं लोक असामी २५ पंचवीस येविसी. सनद.

१ तालुके रेवदंडा, निसबत बळवंतराव रामचंद्र पैकीं लोक असामी ७५ पाउणशें येविसी. सनद.

१ किल्ले महिमतगड, निसबत आपाजी शिंदे पैकीं लोक असामी २५ पंचवीस येविसी. सनद.

१ तालुके सरसगड, निसबत विठोजी गायकवाड पैकीं लोक असामी ५० पन्नास येविसी. सनद.

१ तालुके कर्नाला, निसबत रघुनाथ धोंडदेव पैकीं लोक असामी ७५ पाउणशें येविसी. सनद.

१ किल्ले माहुली, निसबत भगवंतराव शिंदे पैकीं लोक असामी ७५ पाऊणसें येविसी. सनद.

१ किल्ले हाय, मामले कोहजपैकीं केशवराव जगन्नाथ पैकीं लोक असामी ५० पन्नास येविसी. सनद.

१४

रसानगी याद.

जमाजामदारखाना.

११२।१७१. कमावीसभेट, बाबद महाराज छत्रपति संस्थान करवीर यांजकडून बा- इ० स० १८०३।०४ ळोजी थोरात वगैरे हुजरे असामी पांच पोषाक घेऊन आले. आर्या मयातैन व अलफ जि- ते जमा सनगें एकूण किंमत रुपये. ल्हेज १६.

३६३ राजश्री बाबासाहेब यांस, गुजारत त्रिंबकजी डेंगळे खिजमतगार. रुपये.

३० तिवट पैठणी.	१
२५० दुपटा पैठणी.	१
७५ किनखाप.	१
८ शेला धुवट.	॥
३६३	३॥

A. D. 1803-1804. 112. Presents were received from the Kolhapur Raja.

NATIONAL ARCHIVES OF INDIA

१८३ राजश्री आपासाहेब यांस, गुजारत रामजी जोरी खिजमतगार, सनगें येकूण रुपये.

१९	तिवट पैठणी.	१.
१००	दुपटा पैठणी.	१.
६०	किनखाप.	१.
८	शेला साधा, धुवट॥.	
१८३		३॥.

१०४ घरांत, गुजारत शिवाजी घुला खिजमतगार. रुपये.

१००	पातळ पैठणी.	१.
४	चोळखण पैठणी.	१.
१०४		२.

९३ सौभाग्यवती सिताबाई यांस, गुजारत कृष्णाजी घाटगे खिजमतगार. रुपये.

९०	पातळ पैठणी.	१.
३	चोळखण.	१.
९३		२
७४३		११.

राजकीय (ब) इतर माहिती.

(१९) निशाम.

जमा, जामदारखाना.

११३।१३ अ कमावीस भेट, राजश्री आपा साहेब यांसी बाबत नबाब निजामअली खान बहादर यांणीं हैदराबादेहून पाठविलीं, ती मैनुबैले यांणीं सरकारांत आणून दिल्ही. ती गुजारत रायाजी वागमारा खिजमतगार, सनगें येकूण. रुपये.

इ० स० १७९६।९७ सवा तिसेन मया व अलफ सफर १२.

२१	चिराजरी.	१.
६	गोषपेच.	१.
१०९॥	जामेवार जरी ३ येकूण.	रुपये.
२१	पटका जरी.	१.
१५०	शालफर्द २, दर ७५ प्रमाणें रुपये.	
१९०	किनखाप.	१.
४५७॥		

A. D. 1796-97. 113. Presents were sent by Nabab Nizam ali Khan Bahadur from Hyderabad to Appasaheb.

NATIONAL ARCHIVES OF INDIA

११४।१५ मसिरूलमुलुक बाहादुर यांचे नांवें जाब कीं, नबाब निजामअली खान बहादूर यांणीं साल गुदस्ता तुम्हांस खर्चाबद्दल पन्नास हजार रुपयांच्या हुंड्या करून पाठविल्या. त्यास तो ऐवज परभारा साहुकारापासून गुजारत छ २३ रमजानीं पोतेचाल सरकारांत घेतला. त्या ऐवजीं तुम्हांस खर्चास रुपये, २५००० पंचवीस हजार सरकारांतून दिले. बाकी रुपये २५००० पंचवीस हजार राहिले ते सन खमस तिसेनांत नबाबापासून सरकांत ऐवज घ्यावयाचा ठरला आहे; त्या ऐवजीं मजुरा पडतील. ह्मणोन जाब.

इ० स० १७९६-९७ सबा तिसेन मया व अलफ; रबिलावल २१

११५।२७ वामनाजी हरि यांचें नांवें सनद कीं, तुम्ही विनंति पत्र छ ३० सा-बानचें पाठविलें तें प्रविष्ट जाहलें. परगणे जालनापूर येथील ठाणें घ्यावयाकारितां शहरच्या सुभ्याकडील सात आठशें स्वार, व सातशें प्यादे, व तीन तोफा इतका सरंजाम बदलापुरास आला आहे. पाऊण महिना होत आला. सांप्रत हैदराबादेहून दोन चारशें स्वार मदतीस आले आहेत. या आठ दिवसांत त्यांणी फारच जलदी केली. परंतु स्वार व प्यादे ठेऊन व आठोळे व मोरे शिंदखेडकर मदतीस आणून मजबुदीनें आहों. त्यास ठाणें नबाबाकडे द्यावें. किंवा न द्यावें, येविसि विस्तारेंकरून लिहिलें तें कळलें. ऐशास तुह्मीं स्वार व प्यादे ठेऊन ठाण्याचा बंदोबस्त केला आहे. त्याप्रमाणें मजबुदीनें राहणें, नबाबाकडे ठाणें न देणें, ह्मणोन.

इ. स. १७९६-९७ सबा तिसेन मया व अलफ; रमजान ५

सनद.

परवानगी रुबरु.

११६।२८ परगणे मोहोळ, येथील ठाणें घ्यावयाकारितां, नबाबाकडील लोक आले आहेत. त्यांची व आमची नित्य गोळा गोळी होत आहे. याजमुळें शिबंदीचा पेंच पडतो. त्यास परगणे मजकुरचे ठाणें त्यांजकडे द्यावें किंवा न द्यावें ह्मणोन तुम्हांकडील कारकून यांणीं विनंति केली. त्याजवरून हे सनद तुम्हांस सादर केली असे. तरी परगणें मजकुरचे ठाण्याचा बंदोबस्त चांगला करून मजबुदीनें राहणें. नबाबाकडे ठाणें न देणें. ह्मणोन रामचंद्र शिवाजी यांचें नांवें.

इ. स. १७९६-९७ सबा तिसेन मया व अलफ; रमजान १५.

सनद.

रवानगीरुबरु.

---

114. Nabab Nizamali Khan Bahadur sent last year Hundis of Rs. 50000 to Musirulmuluk Bahadur for his expenses. Rs. 25000 out of the sum were given to Masirul for his expenses and the remaining amount was adjusted against the sum payable to Government by the Nabab.

A. D. 1796-97.

115. Wamnaji Hari officer of Pargana Jalnapur reported that Nizam's troops had attacked the Thana, that he was trying to do his best to defend it with the assistance of Atole and More of Sindkhede, and requested instructions whether he should surrender the Thanna to the Nabab. He was directed to defend the Post.

A. D. 1796-1797.

116. A similar Report was received from the officer of Pargana Mohol and similar orders were issued to him.

A. D. 1796-97.

NATIONAL ARCHIVES OF INDIA

११७।३४ हवेली दौलताबाद येथील जहागिरीचा अंमल नबाब निजामअली खान बहादर यांजकडून सन खमस तिसेनांत सरकारांत घेतला. त्याची कमावीस तुह्मांकडे सांगितली होती. ते दूर करून सदरहू अमल नबाबाकडे दिल्हा असे. तरी त्यांजकडील कमावीसदार हे सनद व त्यांचें पत्र घेऊन येईल त्याचे हवाली हवेली मजकुरचें ठाणें करून कबज घेणें. म्हणोन रामचंद्र महादेव यांचें नांवें.

इ. स. १७९६-९७. सबा तिसेन मया व अलफ जिलकाद २०.

सनद.

रसानगी, त्रिंबकराव नारायण
परचुरे, कारकून निसबत दप्तर.

११७ पैकीं.

नबाब निजामअली खान बहादर यांजपासून सन खमस तिसेनांत महालानिहाय येथील जाहागिरीचा अंमल सरकारांत घेतला होता. त्यापैकीं माघारा दिल्हा येविसी.

इ० स० १७९६-९७ सबा तिसेन मया व अलफ जिलकाद २४.

सनदा.

१ महालानिहाय येथील जमीदार यांस कीं, नबाबाकडील कमाविसदारासी रुजु होऊन जहागिरीचा अंमल सुरळीत देणें म्हणोन.

३ सरकार परांडे.
- १ हवेली परांडे.
- १ परगणे मांडवे.
- १ परगणे मोहोळ.

३

५ सरकार धारुर.
- १ परगणे आंबे जोगाईचें.
- १ परगणे परळी.
- १ कसबे पानगांव बाराबिदीचें.
- १ कसबे खळविहिरें.
- १ परगणे बारशी, परगणे मौजे देवळाली.

५

३ सरकार पैठण.
- १ हवेली पैठण, खेरीज खातगांव वगैरे देहें.
- १ परगणें दाऊरवाडी.
- १ परगणें शेंदूरवादे.

३

---

117. The Jahagir Amal of Haveli, Daulatabad, and various Mahals in Parande, Dharur, Paithan, &c. taken from Nabab Nizamali Khan in A. D. 1794-95 was ordered to be restored to him.

A. D. 1796-97.

NATIONAL ARCHIVES OF INDIA

२ सरकार वासीम.

१ परगणें आंवढे.

१ परगणें चारठाणें, परगणें मौजे उमरखेडे.

२

१ हवेली पाथरी.

१ मामले बीड.

४ सरकार नांदेड.

१ परगणे इंदूर.

१ परगणे बोधन.

१ परगणे म्हैस.

१ परगणे उदगीर, परगणे मौजे जळगांव.

४

२ सरकार दौलताबाद.

१ हवेली दौलताबाद.

१ कसबे खराडी, उर्फ तुर्काबाद.

२

१ परगणें पडदूर, परगणें देहें.

२२ महाल व गांव बेवीस येविसी सनद.

१ महालानिहाय येथील अंमल लावून घेतला होता. त्यांस महाल व गांव खराब सबब जाहागिरीचा अंमल बसविला नव्हता, तो हल्लीं माघारा दिल्हा असे. तरी त्यांजकडील कमावीसदाराशीं रुजू होऊन जाहागिरीचा अंमल सुरळीत देणें म्हणोन जमीदार यांस.

१ परगणे हरदापूर.

१ परगणे रेणापूर.

१ परगणे नळदुर्गपैकीं गांव.

३ महाल व गांव तीन येविसी. सनद.

१ रामचंद्र शिवाजी यांस कीं, परगणे मोहोळ सरकार परांडें येथील जहागिरीचे अंमलाची मामलत तुम्हांकडे सांगितली होती. ते दूर करून नबाबाकडे अंमल दिल्हा असे. तरी त्यांजकडील कमाविसदार हे सनद व त्यांचें पत्र घेऊन येईल त्याचे हवालीं परगणें मजकुरचीं ठाणीं करून कबज घेणें म्हणोन सनद.

३

NATIONAL ARCHIVES OF INDIA

येकूण तीन सनदा सदरहूप्रमाणें करून दिल्हा, येविशी रसानगी यादी दोन.

११८।३९ किल्ले दौलताबाद येथील अंमल दरोबस्त तुम्हांकडे सांगितला आहे. तो दूर करून नबाब निजामअल्ली खानबहादर यांजकडे किल्ला देविला असे. तरी नबाबाकडील हे सनद व त्यांचें पत्र घेऊन येईल त्याचे हवालीं किल्ले मजकूर करून कबज घेणें. म्हणोन

इ. स. १७९६।९७ सबा तिसेन मया व अलफ. जिलकाद २२

दिनकर बल्लाळ यांचें नांवें. सनद १.

येविसी सदरहु अन्वयें मशारनिल्हेचें नांवें. सनदा २.

१ दुसरी सनद कीं, अलाहिदा सनद सादर जाहली आहे त्याप्रमाणें किल्ला हवालीं करणें ह्मणोन.

१ तीसरी सनद कीं, अलाहिदा दोन सनदा सादर झाल्या आहेत. त्याप्रमाणें किल्ला हवाली करणें ह्मणोन.

२

रसानगी त्रिंबक नारायण परचुरे, कारकून निसबत दप्तर.

११९। ४६ परगणें आंबडापूर सरकार मेहेकर येथील जाहागिरीचा अंमल सन खमस तिसेनांत नबाब निजामअल्ली खान बहादर यांनीं सरकारांत दिला असतां नबाबा कडील चैनसिंग यानें सरकार सनदेशिवाय ठाणें घेतलें आहे. त्यास हल्लीं पेशजीप्रमाणें जाहागिरीचा अंमल सरकारांत घेऊन, कमावीस लक्ष्मण खंडेराव यांजकडे सांगितली असे; तरी मशारनिल्हेशीं रुजू होऊन अंमल सुरळीत देणें. नबाबाकडील अंमलदाराकडे वसूल न देणें. ह्मणोन जमीदार परगणें मजकूर यांचे नांवें. सनद १.

इ.स. १७९७।९८ समान तिसेन मया व अलफ. मोहरम ९.

रसानगी अंताजी गोविंद आपटे कारकून निसबत दप्तर.

१२०।४७ परगणें मनरुप सरकार सोलापूर येथील जाहागिरीचा अंमल नबाब निजामअली खान बहादर यांणीं सरकारांत दिल्हा. त्याची कमावीस सालमजकूरीं तुम्हांकडे सांगितली असे; तरी इमाने इतबारे वर्तोन अंमल चौकसीनें करून आलाहिदा अजमास ठरा-

इ० स० १७९७-९८ समान तिसेन मया व अलफ. मोहरम १४.

A. D. 1796-97. 118. Similarly the fort of Daulatabad was restored to him.

119. The Jahagir of Pargana Amdapoor in Sirkar Mehekar was in A. D. 1794-95, surrendered to Government by Nabab Nizamali
A. D. 1797-98. Khan. The Thana was however taken back by Chensing in the service of the Nabab. It was now ordered to be recovered.

120. The Jahagir Amal of Pargana Manrup in Sirkar Sholapur was sur-
A. D. 1797-98. rendered by Nizamali Khan.

NATIONAL ARCHIVES OF INDIA

ऊन दिल्हा जाईल त्याप्रमाणें वर्तणूक करणें. ह्मणोन जनार्दन शिवाजी याचे नांवें सनद १.
येविसी सनदा २.

१ रामचंद्र शिवाजी यांस कीं, परगणें मजकूर येथील मामलत मशारनिल्हे यांजकडे सांगितली असे. तरी तालुके सोलापूर पैकीं सरंजाम देऊन, अंमल बसऊन देणें. ह्मणोन सनद.

१ जमीदार परगणें मजकूर यांसी कीं, मशारनिल्हेसी रुजू होऊन अंमल सुरळीत देणें. ह्मणोन सनद.

२

रसानगी, त्रिंबक नारायण परचुरे कारकून निसबत दप्तर.

१२१।१०० नबाब निजामअल्ली खान बहादर यांचे पुत्राचें लग्नाचे अमंत्रणाकरितां शौकतदौला बहादर पुण्यास आले. त्यांस निरोप समयीं सरकारांतून हत्ती नग १ बक्षीस देविला असे, तरी गोविंदरावकृष्ण यांजकडील हत्ती धारासीवाचे ठाण्यांतील तुह्मांजवळ आहे, तो मशारनिल्हे यांस देऊन रसीद घेणें. ह्मणोन निजाम नबाबजंगबाहदर यांचें नांवे सनद १.

इ. स. १७९९।१८००. मयातैन व अलफ. जमादिलावल २२

रसानगी धोंडो नारायण लिमये.

बाळोजी कुंजीरच्या कीर्दीपैकीं.

१२२।१४९ तालुके सोलापुर येथें किल्लयानजीक नबाब निजामअल्ली खान बहादर यांजकडील फौजा फिरतात. त्यांस कदीम शिबंदी आहे ती किल्ल्याचे बंदोबस्तास लागते. त्या शिबंदीनें तालुक्याचा बचाव होत नाहीं. सबब जास्ती शिबंदी ठेवण्याची आज्ञा झाली पाहिजे. ह्मणोन तुह्मांकडील कारकुनांनीं हुजूर विनंति केली. त्याजवरून हे सनद तुह्मांस सादर केली असे. तरी तालुक्याचे बंदोबस्तास शिबंदी कार्याकारण लागेल तशी ठेऊन किल्लयाचा व तालुक्याचा बंदोबस्त करून हुशारीनें राहणें. काम जाहल्यानंतर शिबंदी दूर करणें. ह्मणोन रामचंद्र शिवाजी मामलेदार तालुके मजकूर यांचे नांवें. छ १० जमादिलाखर सनद १.

इ. स. १८०१।०२ इसने मयातैन व अलफ. जमादिलाखर १०

रसानगीयाद.

---

121. Shoukat Doula Bahadoor came to Poona to give an invitation to the Peshwa for the marriage ceremony of Nabab Nizamali Khan's son.

A. D. 1799-1800.

122. The forces of Nizamali Khan Bahadoor were moving about the fort of Sholapur. Additional men were therefore ordered to be employed for its protection.

A. D. 1801-1802.

NATIONAL ARCHIVES OF INDIA

१२३।१७५ देणें, नबाब पोलाद अल्लीखान बाहादर यांचे तीर्थरूप नबाब निजाम-
इ. स. १८०३-०४ अल्ली खान बाहादर मृत्यु पावले सबब त्यांचे नांवें मुबारकबादीचीं
आर्बा मयातैन व अलफ. वस्त्रें सरकारांतून कृष्णाजी माणकेश्वर कारकून शिलेदार याज
सफर ९ बरोबर पाठविलीं त्यां समागमें जवाहिराचे दागीनें खाशांनीं रु-
बरु पाहून दिले ते.

किंमत. रुपये.
६९४८॥ ऐन किंमत
१७३७८= सवाई.

८६८९॥=
येकूण जडावदागिने

६ खासा यांस किंमत. रुपये.
४९७९। ऐन किंमत. रुपये.
१२४४॥।- सवाई

६२२४८-

१ शिरपेंच घाट साधा, तीन फुलांचा, रुप्याचे किरणाचा. बाबद खरेदी वजीरचंद जोहरी पैकीं. किंमत रुपये.
८०० ऐन किंमत. रुपये.
२०० सवाई.

१०००
येकूण शहत.
५३ हिरे, हिरकण्या मदनाईकसुद्धां.
४ माणके.
१ पाच, लोलक.

५८

१ जगो घाट साधा, रुप्यार्चे किरणाचा, बाबद खरेदी वजीरचंद जोहरीपैकीं.
छ ६ जिलकाद सन मजकूर. किंमत रुपये.
९०० ऐन किंमत. रुपये.
२२५ सवाई.

११२५
येकूण शहत.

123. Nabab Nizamali having died a letter of condolence together with a present of jewels worth Rs. 8685 was sent to his son Poladali Khan Bahadoor by the Peshwa.

A. D. 1803-1804.

NATIONAL ARCHIVES OF INDIA

६३ हिरे, हिरकण्या मदनाईकसुद्धां.
२ माणकें.
१ पाचलोलक.

६६

१ कंठी मोत्याची, बाबद कमावीस भेट व्यंकाजी दादाजी दिपड यांजकडून आली. (सर्व दागिन्याचा तपशिल दिला नाहीं. माहिती अपूरी आहे.)

१२४।१९८ कमावीस आहेर, राजश्री बाबासाहेब यांचें लग्नाबद्दल. दिमत नबाब पोलादजंग बाहादर यांनीं हैदराबादेहून भिवराव कृष्ण यांजबरोबर आहेर पाठविला. त्याजवर जवाहिराचे दागीने आले. ते जमा गुजारत दिपाजी थोरात खिजमतगार. किंमत गुजारत वजीरचंद जोहरी जामदार, सुकराय काशीकर, व रुपचंद जोहरी. ८९८७ रुपये.

इ. स. १८०६।०७ सवा मयातैन व अलफ. सवाल २.

येकूण जडावदागीने.

१६ खाशांस आले ते किंमत रुपये.

८ बद्दल नबाब पोलादजंग यांजकडील.

किंमत रुपये.

१ शिरपेंच घाट मिनेगार, मिना हिर्वा व पांढरा, तीन पेट्यांचा किंमत रुपये ४९५.

येकूण शहत.

९० हिरे व हिरकण्या अजमासें वजन रती सुमारे १२ दर २८ प्रमाणें किंमत. रुपये ३३६.

३ पाचा, मदनाईक अजमासें वजन रती १६ दर ५ प्रमाणें रुपये ८०.

१ मोतीं, लोलक खर्डा खंडीत रुपये ३०

० सोनें, व आजुरा रुपये ४९

५४

१ जगो घाट मिनेगार, मिना हिरवा व सफेत. किंमत रुपये ६१६.

येकूण शहत.

६६ हिरे व हिरकण्या, अजमासें वजन रती १७ दर २८ प्रमाणें रुपये ४७६.

१ मोती लोलक लांबट खंडित. रुपये ४५.

124. A present of jewelry was sent to the Peshwa and Lady Waranashibai by Poladjnng Bahadoor from Hydrabad on the occasion of their marriage. The names of the different jewel ornaments and their prices are given.

A. D. 1806-1807.

NATIONAL ARCHIVES OF INDIA

१ पाच, मदनाईक अजमार्शे रती८दर ५ प्रमाणें किंमत रुपये ४०
० सोनें व आजुरा रुपये ५५

१८

१ कंठी मोत्याची किंमत १६७५ रुपये.

येकूण शहत.
१० धुगधुगी घाट साधा किंमत रुपये २०५.
९ हिरे व हिरकण्या अजमार्शे वजन रती, रुपये ११२॥.
१ प्रत हिरा नाईक पानघाट, वजन रती, येकूण रुपये५०.
८ प्रत हिरकण्या वजन रती २॥ दर२५प्रमाणें रुपये६२॥.

९

१ मोतीं लोलक अजमार्शे रती ६, चव २०॥= दर ४ प्रमाणें रुपये ८२॥
० सोनें व आजुरा. १०

१०

५८ मोत्यें माळेस, वजन टांक ६॥१॥, चव २४५ दर १ प्रमाणें रुपये १४७०

६८

२ पोहोच्या हिरे टिकाच्या घाटमीनेगार, मिना लाल व हिरवा व सफेत, पेव्या दर १६ प्रमाणें३२व फुलें दर१प्रमाणें२येकूण किंमत रुपये ४००.

येकूण शहत.
११० हिरे व हिरकण्या आजमांशें वजन रती, ३२४ रुपये.
९६ प्रत पेव्या, दर १६ प्रमाणें ३२ येकूण दर ३ प्रमाणें.
वजन रती १४ दर १८ प्रमाणें रुपये २५२.
१४ प्रत फुलांस दर७प्रमाणें, रती ३दर२४प्रमाणें रुपये ७२.

११०

० सोनें, व अजुरा रुपये ७६.

११०

२ बाजूदंडाच्या मिनेगार. मिना हिरवा, निळा, व सफेत किंमत रुपये९२५.

येकूण शहत.
१०० हिरे व हिरकण्या अजमार्से वजन रती, रुपये ७३५.
४ प्रत बाजूस पानघाट वजन रती, दर ४०प्रमाणें रुपये १२०.

NATIONAL ARCHIVES OF INDIA

८ प्रत पानाचें, वजन रती ४ दर ३५ प्रमाणें रुपये १४०.
८८ प्रत घेराचे वैगरे, वजन रती १९ दर २५ प्रमाणें किंमत रुपये ४७५.

१००

२ पांचाचौक्या दर १ प्रमाणें वजन रती १२ दर ४ प्रमाणें किंमत रुपये ४८.
० सोनें व अजुरा रुपये १४२.
१ तुरा माणीकमणी, व पाचमणी, मोत्यांचे सर ८, खेरीज दांडी मळसूत्री, वर जडाव किंमत रुपये ५१६.

येकूण शहत.

२० फुलांस किंमत रुपये २००.
१० हिरे अजमासें वजन रती २॥ दर २५ प्रमाणें, किंमत रुपये ६२॥.
५ पाचा लोलक मणी लटकते सभोंवतें, अजमासें रती ५ दर ५ प्रमाणें रुपये २५.
५ मोत्यें लटकतीं, अजमासें रती चव १७ दर ४ प्रमाणें, रुपये ६८.
० खोटें हिरवे दखलबाद.

सुमार.

१ नाईक,
१० फुलांचे मार्गे,

११

० सोनें व आजुरा रुपये ४४॥.

२०

१० दांडीस, दांडी मिनेगार, एका अंगास रावा व फूल येकूण रुपये ५०.
९ हिरे, हिरकण्या अजमासें वजन रती, १। दर २० प्रमाणें, रुपये २५.
७ फुलांस.
२ राव्याचे पंखास.

९

NATIONAL ARCHIVES OF INDIA

१ मोतीं राव्याचे मुखास, लटकतें.
अजमासें चव १। रुपये ७.
० सोनें, व आजुरा रुपये १८.
१०

१२६ सरास सर ८ येकूण किंमत रुपये २६६.
११ हिरे व हिरकण्या, अजमासें वजन रती, दर १५ प्रमाणें. रुपये ३०.
३ प्रत, माथामणी १ येकूण.
८ प्रत टींका, खालील सराचे शेवटास.
११
७३ मोलें, सरास व टिकेस लटकतीं मिळोन,
अजमासें चव ४० दर ५ प्रमाणें रुपये २००.
१० ठिकास लटकतीं.
३ वरील मण्यास लटकतीं.
६० सरास.
७३
२१ पांचमणी, अजमासें रती ३ दर ५ प्रमाणें. रुपये १५.
२१ माणीक मणी दर १ प्रमाणें रुपये २१.
१२६
१९६

तपसील,
३० हिरकण्या.
२१ माणकें चुणीं.
२१ पांचा व किर्डे.
७९ मोलें.
१५६

८ प्रत बदल मीर अमल, दिंमत मशारनिल्हेपैकीं, किंमत रुपये २७९५.
येकूण दागीने.
१ हार टीकाचा, घांट मिनगार मिना हिरवा व पांढरा, खेरीज, पदक, किंमत रुपये ६२५.
२० पदकांस किंमत रुपये १७६.
१८ हिरे व हिरकण्या, अजमासें रती ४ दर २५ प्रमाणें रुपये १००.
२ पाचा किंमत रुपये ५१.

NATIONAL ARCHIVES OF INDIA

१ प्रत मदनाईक चौकी, अजमासें रती५दर७ प्रमाणें, रुपये३५.
१ प्रत लोलकमणी, अजमासें रती सुमारे २ रुपये १६.

२

० सोनें व अजुरा रुपये २५.

२०

३३८ टीका, दर २१ प्रमाणें ४२ येकूण रुपये ४४९.
२५४ हिरे, हिरकण्या, अजमासें रती १७ दर१५प्रमाणें रुपये २५५.
२४० टीका ४० दर ६ प्रमाणें.
१४ टीका २ दर ७.

२५४

७२ मोत्यें, टीका ३६ येकूण दर २ प्रमाणें, अजमासें चव २५
दर १॥ प्रमाणें रुपये ३७॥.
१२ माणीक मणीं, टीका ६ दर २ प्रमाणें,
किंमत दर -।॥- प्रमाणें रुपये. ९.
० सोनें, व आजुरा रुपये. १४७॥.

३३८

३५८
१ शिरपेंच, घाट मिनेगार, मिना हिरवा व पांढरा, रुपये ३१५.
येकूण शहत.
४६ हिरे व हिरकण्या, अजमासें रती १०
दर २२ प्रमाणें किंमत रुपये २२०.
४ पाचा किंमत रुपये ५२॥.
३ प्रत मदनाईक, अजमासें रती १५
दर २ प्रमाणें रुपये ३०.
२ प्रत बाजूस लांबट,
१ नाईक गडा थोर,

३

१ प्रत, मणी लोलक, वजन रतीं ९
दर २॥ प्रमाणें रुपये २२॥.

४

० सोनें व आजुरा ४२॥.

NATIONAL ARCHIVES OF INDIA

१ जगोघांट मिनेगार, मिना हिरवा व सफेद किंमत रुपये. ३४०.

शहत.

५४ हिरे व हिरकण्या, अजमासें वजन रती १० दर २५ प्रमाणें रुपये. २५०.

२ पाचा किंमत रुपये. ४६॥.

१ प्रत मदनाईक लांबट, अजमासें रती ६ दर ४ प्रमाणें रुपये. २४.

१ प्रत लोलकमणी, अजमासें रती ९ दर २॥ प्रमाणें रुपये २२॥.

२

० सोनें व अजुरा रुपये. ४३॥.

५६

२ पोंहोंच्या घाट मिनेगार, मिनालाल व निळा व सफेद, पेत्या व सोमासें दर १० प्रमाणें २० व मधील फूलें दर १ प्रमाणें २ येकूण किंमत रुपये. ७००.

शहत.

१२२ हिरे व हिरकण्या अजमासें वजन रती, रुपये. ९८९.

२४ प्रत वजन रती १० दर ३० प्रमाणें रुपये ३००.

८० प्रतफुलाचे मोतीं, चौक्या वजन रती दर ४० प्रमाणें रुपये ६०.

१६ प्रतफुलांचे घेरास रती ५ दर ३० प्रमाणें किंमत रुपये १९०.

१२२ (नग २ रुपये ६० चे नमूद नाहींत.)

० सोनें व अजुरा रुपये. ११९.

१२२

२ बाजूदंडाच्या घाट मिनेगार, मिना लाल व हिरवा व पांढरा, किंमत रुपये. ५२५.

शहत.

८८ हिरे व हिरकण्या दर ४४ प्रमाणें, अजमासें वजन रती १८ दर १८ प्रमाणें रुपये. ३२४

६ पाचामदनाईक, दर १ प्रमाणें, अजमासें वजन रती २५ दर ४ प्रमाणें किंमत रुपये. १००

० सोनें व अजुरा रुपये. १०१

९४

NATIONAL ARCHIVES OF INDIA

१ तुरा, खेरीज दांडी व फुल घाट मिनेगार, किंमत रुपये २५०.
३५ फूल खेरीज दांडी मळसुत्री, मिनेगार. रुपये १३०.
९ हिरे व हिरकण्या, आजमासें वजन रती २॥
दर २० प्रमाणें. रुपये ५०.
४ फुलास.
५ दांडीस फूल १ व बेलाचें पान येक येकूण.
९
१८ पाचा अजमासें वजन रती. रुपये ३९।.
१ प्रत मदनाईक, माथेदार वजन रती ३. रुपये १८.
४ प्रत वजन रती २॥ दर ३ प्रमाणें. रुपये ७॥.
८ प्रत फुलांचे मागें रती. रुपये ६.
५ दांडीचे फुलांस व बेलाचें पानास,
रती १। दर ३ प्रमाणें, रुपये ३॥॥.
१८
८ मोतीं लटकतीं सभोंवती, दर दाणा रुपये १।प्रमाणें किंमत रुपये १०.
० सोनें फुलाचें व दांडीचें मिळोन व आजुरा, रुपये ३४॥॥.
३५
१३० सरास, सर मोत्यांचे येकूण किंमत रुपये १२०.
६ सरांचे माथामणी १ येकूण रुपये. १३.
३ पाचा रुपये ३.
३ मोत्यें लटकती. रुपये ५.
६
० सोनें व आजुरा रुपये ५.
६
१०८ मोत्यें सरास, आजमासें चव १२ दर ६ प्रमाणें, रुपये ७२.
१६ टीका, शेवटास लटकत्या. रुपये १५.
३ हीरे, अजमासें रती -॥· दर १४ प्रमाणें रुपये ७.
४ पाचा. रुपये ४.

NATIONAL ARCHIVES OF INDIA

९ मोत्यें लटकतीं. दर दाणा रुपये १। प्रमाणें रुपये ११।.
० सोनें व अजुरा रुपये. १२॥।.

१६

१३०

१६५

तपसील.

१२ हिरे व हिरकण्या.
२५ पाचा व किर्डे.
१२८ मोत्यें.

१६५

१ सौभाग्यवती वाराणशीबाई यांस आले ते किंमत रुपये १६०५.

जडाव दागिनें,

१ बाबत नबाब पोलादजंग बहादरपैकीं हार टीकाचा, घाट मिनेगार, मिना हिरवा व पांढरा, किंमत रुपये ८४०.

शहत.

३७ पदकास घाट मिनेगार, किंमत रुपये १९२.
३६ हिरे व हिरकण्या अजमासें वजन रती. रुपये १११.
१३ प्रत घेराचे मोत्यांसुद्धां रती ३ दर २५ प्रमाणें. रुपये ७५
२३ प्रत बारीक घेराचें, वजन रती २ दर १८ प्रमाणें. रुपये ३६.

३६

१ पाचमणी लोलक वजन रती ७ दर ८ प्रमाणें. रुपये ५६.
० सोनें व आजुरा. रुपये २९.

३७

३२६ टीका व सोमासें दर २० प्रमाणें ४० येकूण किंमत. रुपये ६४८.
२४२ हिरकण्या अजमासें रती २४ दर १६ प्रमाणें. रुपये ३८४.
४ पाच किर्डे, सोमाशांस, रुपये. ।.

NATIONAL ARCHIVES OF INDIA

८० मोलें अजमासें चव ३० दर ३॥ प्रमाणें, रुपये १०५.
० सोनें व आजुरा रुपये १५८॥.

३२६

३६३

२ बाबद मिर अलम दिमत मशारनिल्हे पैकीं पोंहोच्या, घाट मिनेगार मिना हिरवा व सफेद, टीका २८ व मधील फुलें दोन एकूण किंमत रुपये७६९.

शहत.

१०० हिरे व हिरकण्या, अजमासें वजन रती २९ दर २५ प्रमाण किंमत रुपये. ६२५.
२ पाचा मदनाईक दर १ प्रमाणें, अजमासें वजन रती ८ दर ८ प्रमाणें किंमत रुपये. ६४.
० सोने व अजुरा किंमत रुपये. ७६.

१०२

३

१९

१ राजकीय (ब) इतर माहिती.

(२०) जंजिऱ्याचा नबाब.

१२५।२३९. सिद्दी अबदूल करीमखान शामल जंजिरेकर यांजकडे जहागीर सरकारांतून चालत होती, त्यास ते मृत्यु पावले. त्यांचे पुत्र आहेत त्यांचीं नांवें.

इ. स. १८११।१२ इसन्ने अशर मयातैन व अलफ रबिलावल १.

१ सिद्दी इब्रामखान.
१ सिद्दी इसमानखान.
१ सिद्दी महमदखान.

125. Siddi Abdul Karimkhan of Jangira died leaving 6 sons—Siddi Ibhramkhan, Siddi Ismankhan, Siddi Mahamadkhan, Siddi Yousabkhan, Siddi Abdulkadarkhan and Siddi Abdulakhan. The 2nd of these sons asked for a portion and represented that he could not live amicably with his brothers and requested the Peshwa to give him his share in the Jahagir enjoyed by his father from the Peshwa's Government. His request was granted and the revenues of 3 villages were assigned to him.

A. D. 1811-12.

NATIONAL ARCHIVES OF INDIA

१ सिद्दी युसबखान.
१ सिद्दी अबदुल कादरखान.
१ सिद्दी अबदुलाखान.

६

येकूण सहा पुत्र, यांपैकीं दुसरे पुत्र सिद्दी इसमानखान यांणीं हुजूर पुण्याचे मुक्कामीं येऊन विनंति केली कीं, आपले भाऊ पांचजण यांसी एकत्र बनेना, यांजकरितां वडील भाऊ सिद्दी इब्रामखान यांजवळ आपले हिशाची सहावी वांटणी मागितली परंतु ते देत नाहींत, याजकरितां सरकारांतून वांटणी करून देविली पाहिजे. म्हणोन त्याजवरून सिद्दी अबदुल करीमखान यांचें नांवें सरकारांतून जहागीर चालत आहे त्याची बेरीज रुपये.

७०२७९। परगणें सत्रागांव प्रांत गुजराथ येथील आकार सन सीत समानीनांत जाहला आहे ते बेरीज ऐन जमा व शिवाय जमा वगैरे मिळोन बेरीज रुपये ७५१०८॥
पैकीं वजा सरकारांत सरसुभा प्रांत मजकुराकडे
२३२९। मुलजा फकरूद्दीन यांजबाबत दीड गांवची जप्ती सरसुभाकडे आहे त्याची बेरीज रुपये.
२५०० देसाईगिरी बाबत सरसुभा सालाबाद द्यावे लागतात ते रुपये.

४८२९।
बाकी रुपये.

१५९७६४= परगणे पारचोल प्रांत गुजराथ पैकीं तीन गांव आहेत तेथील आकार सन सबा समानीनांत जाहला, त्याप्रमाणें ऐन जमा व खेरीज जमा मिळोन.
८२४७४= मौजे वडेछा.
४१४६। मौजे कोथा.
३५८२॥। मौजे वासण.

१५९७६४=

८६२५५।=

येकूण शायसी हजार दोनशेंसवापंचावन रुपये तीन आणे, पैकीं त्यांचे दुसरे पुत्र सिद्दी इस्मानखान यांजकडे सहावे हिशाचे वाटणीचे जहागिरीची बेरीज रुपये.

१४३७५॥।=॥ यांसी गांव परगणें पारचोल पैकीं.
८२४७४= मौजे वडेछा.
४१४६। मौजे कोथा.
१९८२।=॥ मौजे वासण येथील जमा ३९८२॥। रुपये पैकीं नेमणूक रुपये.

१४३७५॥।=॥

येकूण चवदा हजार तीनशें पावणेंशहात्तर रुपये अडीच आणे बेरजेची जहागीर सिद्दी इस्मानखान यांजकडे परगणें पारचोल पैकीं गांवचा अंमल पेशजीचे जहागिरींतील सालमजकुरीं लावून देविला येविसी सनदापत्रें.

१ सिद्दी इब्रामखान यांस कीं तुमचे तीर्थरूप सिद्दी अबदुल करीमखान यांजकडे जहागीर सरकारांतून चालत होती, त्या बेरजेंत परगणें पारचोल प्रांत गुजराथ पैकीं तीन गांवचा अंमल आहे, त्यास ते मृत्यु पावले, त्यांचे पुत्र तुह्मांसुद्दां साहा, यांजपैकीं दुसरे पुत्र सिद्दी इस्मानखान यांणीं हुजूर पुण्याचे मुक्कामीं येऊन विनंति केली कीं, आपले भाऊ पांचजण यांसी येकत्र बनेना, याजकरितां वडील भाऊ सिद्दी इब्रामखान यांजवळ आपले हिशाची सहावी वांटणी मागितली परंतु देत नाहीं, याजकरितां सरकारांतून वांटणी करून देविली पाहिजे. म्हणून त्याजवरून सिद्दी अबदुल करीमखान यांचे नांवें सरकारांतून जहागीर चालत आहे त्याची बेरीज रुपये ८१२५५।≡ शायसी हजार दोनशें सव्वापंचावन रुपये तीन आणे, पैकीं त्यांचे दुसरे पुत्र सिद्दी इस्मानखान यांजकडे सहावे हिशाचे वांटनीचे जहागिरीची बेरीज रुपये १४३७५।।।≈॥ चवदा हजार तीनशें पावणेंशहात्तर रुपये अडीच आणे, यांसी परगणें पारचोल प्रांत गुजराथ पैकीं सदरहु गांव आहेत त्यापैकीं बेरीज रुपये.

८२४७८≡ मौजे वेडेछा.
४११४६। मौजे कोथा.
१९८२।≡॥ मौजे वासण येथील जमा ३५८२।।। पैकीं नेमणूक रुपये.

१४३७५।।।≈॥

येकूण चवदा हजार तीनशें पावणे शाहात्तर रुपये अडीच आणे बेरजेची जहागीर पेशजीचे जाहागिरीपैकीं सालमजकुरीं लाऊन देविली असे. तरी वर लिहिल्याप्रमाणें मौजे वेडेछा व मौजे कोथा येथील अमल व मौजे वासणपैकीं एक हजार नऊशें सवाव्यायशीं रुपये साडे तीन आणे नेमणूक सिद्दी इस्मानखान घेतील म्हणोन. सनद.

४ यासी रुजू होऊन अंमल व नेमणुकेचा वसूल सुरळीत देणें म्हणून
३ गांवचे मोकदम यांस. सनदा.
१ मौजे वडेछा.
१ मौजे कोथा.
१ मौजे वासण, येथील नेमणूक रुपये १९८२।≡॥ येविसी.

३
१ जमीदार परगणें मजकुरचे यास.

४

५

रसानगीयादी,

१ राजकीय (ब) इतर माहिती.

(२१) हैदरअली व टिपू.

१२६।१६. कमावीस भेट राजश्री आपासाहेब यांसी, बाबद टिपू सुलतान बहादर यांणीं पाठविलीं, ती गुजारत मल्हारजी गाइकवाड खीजमतगार, सनगें येकूण रुपये.

इ० स० १७९६-९७. सबा तिसेन मया व अलफ रबिलाखर १.

१४	चिरा जरी, कारचोबी	१.
१६	पटका जरी, कारचोबी	१.
६०	जामेवार जरी, कारचोबी	२ दर ३०.
१००	किनखाप	१.
१९०		५.

जमा जामदारखाना.

१२७।८२. कमावीसभेट राजश्री बाबासाहेब यांसी, बाबत नबाब टिपू सुलतान यांजकडील वकील वाड्यांत भेटीस आले ते समयीं दिल्ही. गुजारत मुरारजी येवला खीजमतगार सनगें येकूण रुपये.

इ० स० १७९८।९९. तिसा तिसेन मया व अलफ. साबान ३.

२४	चिरा जरी, कारचोबी सोनेरी	१.
२३	पटका जरी, सोनेरी कारचोबी	१.
९२॥	जामेवार जरी, कारचोबी सोनेरी	२.
६०	किनखाप	१.
१९९॥		५

१ राजकीय (ब) इतर माहिती.

(२२) यूरोपांतील राष्ट्रें.

(अ) इंग्रज.

१२८।३०. रघुनाथ रणसोड याजकडे मुंबईचें वकीलीचें काम होतें तें दूर करून रामचंद्र कृष्ण याजकडे सांगोन नेमणूक सालीना रुपये.

इ. स. १७९६।९७ सबा तिसेन मया व अलफ; सवाल ३.

---

126. Present of cloths was received by Appasaheb from Tipoo Sultan Bahadoor. A. D. 1796-97.

127. Tipoo's Agent came to the palace to pay a visit to the Peshwa. A. D. 1798-99.

128. Ramchandra Krishna was appointed to the office of Government agent at Bombay displacing Raghunath Ransod. A. D. 1796-97.

NATIONAL ARCHIVES OF INDIA

५४२ रघुनाथ रणसोड यास नेमणूक होती त्याप्रमाणें.

रुपये.

३८८ नक्त.

१०० जातीस.

२८८ पर दरबारी आहेत सबब दरमाही खर्चास रुपये.

१२ गाडीस.

१२ पोटखर्चाबद्दल.

२४

बारमाहीचे.

३८८

१९४ ऐन जिन्नस भात गोर्डे खंडी १० येकूण, दर खंडीस अजमासाचे दराप्रमाणें रुपये १५।=। येकूण.

५४२

१५८ जाजती मशारनिल्हे यांस दिवट्या व आल्फागिरा व पोरगासुद्धां.

७००

येकूण सातशें रुपये नेमणूक सालमजकुरापासून द्यावयाचा करार करून हे सनद तुम्हांस सादर केली असे, तरी सदरहूप्रमाणें सनद पैवस्तगिरीपासून प्रांत बेलापुर पैकीं दरसाल देत जाणें. म्हणोन आपाजी विष्णु याचें नांवें सनद.

रसानगीयादी.

१२९।६१. कमावीस भेट, बाबद कर्नल पालमर वकील दिमत इंग्रज कलकत्तेकर, यांजकडे मेजवानीस गेले तेथें आली तीं सनगें एकूण रुपये.

इ. स. १७९७।९८ समान तिसेन मया व अलफ जिल्काद ५.

७५२ राजश्री बाबासाहेब यांसी गुजारत भिवजी ढवळा खिजमतगार, सनगें एकूण.

रुपये.

१७	तिबट.	१.
४५	दुपटा.	१.
२००	शालफर्द.	२. दर १०० प्रमाणें.
२५	पटका.	१.
१२०	शेले साधे.	६.

A. D. 1797 98.

129. The Peshwa went to a feast at Col Palmer's and was given a present of clothes.

NATIONAL ARCHIVES OF INDIA

१९० किनखाप २.
९११॥=मुसेजर सनंग ।॥.

६१८॥= १३॥।

१३३॥ गजवार गज येकूण रुपये.

७५ मखमल गज १० दर ७॥.
९८॥ सकलाद गज ६॥ दर ९.

१३३॥ १६॥

७५२४= सनगें १३॥। गज १६॥

४३९ राजश्री आपासाहेब यांसी गुजारत रामजी जोरी खिजमतगार सनगें येकूण.

१८ तिवट १.
३५ दुपटा १.
१८० शालफर्दे २ दर ९० प्रमाणें रुपये.
३० पटका १.
७५ किनखाप १.
६९ शेले साधे धुवट ३.

४०३ ९

३६ मखमल गज ४ दर ९ प्रमाणें रुपये.

४३९ सनगें ९ गज ४.

११९१४= सनगें २२॥। गज २०॥.

१३०।३९. रामचंद्र कृष्ण यांजकडे मुंबईचें वकीलीचें कामकाज होतें तें सालमजकुरीं त्यांजकडून दूर करून हरि सदाशिव यास सांगोन तैनात सालीना रामचंद्र कृष्ण यास पावत होती ती रुपये ७०० पैकीं वजा दिवट्या, अबदागिरा, व पोरगा मिळोन रुपये सालगुदस्त नेमणूक करून दिल्हे होते ते कमी केले १९८, बाकी मशारनिल्हे यांस तैनात सालीना रुपये.

इ. स. १७९७।९८ समान तिसेन मया व अलफ जिल्हेज ३.

३८८ नक्त रुपये.

१०० जातीस.
२८८ परदरबारी आहेत, सबब दरमहा खर्चास रुपये.
१२ पोटखर्चाबद्दल.

130. Hari Sadashiv was appointed Agent at Bombay in place of Ramchandra Krishna. His annual emoluments were fixed at Rupess 542.

A. D. 1797-98.

NATIONAL ARCHIVES OF INDIA

१२ गाडीस.

२४

बारमाही रुपये.

३८८

१५४ ऐन जिन्नस भात गोडें खंडी १०, दर खंडीस अजमासें दराप्रमाणें १५।=।. प्रमाणें रुपये.

५४२

येकूण पांचशें बेचाळीस रुपये सालीना करार करून देऊन हे सनद तुम्हांस सादर केली असे, तरी सनद पैवस्तगिरीपासून सदरहुप्रमाणें तैनात प्रांत बेलापूर पैकीं देत जाणें, म्हणोन आपाजी विष्णु याचें नांवें.

सनद १.

रसानगी यादी.

इ. स. १७९८।९९ तिसा तिसेन मया व अलफ जिलकाद १५.

१३१।९३. तालुके रत्नागिरी येथें इंग्रज कलकत्तेकर यांजकडील पलटणें आली आहेत याजकरितां तालुके मजकुरचे बंदोबस्तास दोनशें लोक जाजती जदीद ठेवावयाची आज्ञा जाहली पाहिजे. म्हणोन तुम्ही विदित केलें त्याजवरून हे सनद सादर केली असे, तरी तालुके मजकुरचे बंदोबस्तास लोक असामी २०० दोनशें जदीद तालुक्याचे शिरस्त्याप्रमाणें इंग्रजाकडील पलटणें तालुके मजकुरीं राहतील तोंपर्यंत ठेऊन बंदोबस्त करणें.

इ० स० १७९८-९९ तिसा तिसेन मया व अलफ. जिल्हेज २२.

१३२।९६ कमावीस भेट, राजश्री बाबासाहेब यांसी बाबत मेस्त्रपालमर (मि. पालमर) वकील दिमत इंग्रज कलकत्तेकर श्रीरंगपटणचें लढाईचें वर्तमान सांगावयासी वाड्यांत आले ते समयीं दिल्ही, तीं गुजारत मुरारजी येवला खीजमतगार. सनगें येकूण रुपये.

१९। चिरा जरी कारचोबी	१.
६७।॥ जामेवार जरी कारचोबी	२.
१९। पटका जरी कारचोबी	१.
६० किनखाप	१.
१६६।	५.

131. An army of the English at Calcatta having gone to Taluka Ratnagiri, A. D. 1798-99, the force in the Taluka was increased.

132. Clothes were received from Mr. Palmer Agent of the English at Calcatta on the occasion of his visit to the palace to communicate news of the battle of Seringapatan. A. D. 1798-99.

NATIONAL ARCHIVES OF INDIA

१३३।११९ बदल देणें परदरबारखर्च, शोरजनराल (सर जॉन शोअर) यांजकडे कलकत्यास लाला चिमणलाल कारकून शिलेदार यास हत्ती व घोडे व पोषाक देऊन सन अर्बा तिसेनांत पाठविलें होते, त्यास खेरेदी हत्ती व घोडे करावयास वगैरे तेच सालीं खर्च जाहला. तो रुपये.

इ० स० १८००–०१ हिंदे मया तैन व अलफ. सवाल २७.

१७४१॥ हत्ती व घोडे खेरेदी केले त्यांची किंमत रुपये.

१०३७॥॥ हत्ती छ ९ जमादिलाखरीं अजिमाबादचे मुकामीं खेरेदी केला. नग १ किंमत रुपये.

७०३॥॥ घोडे खेरेदी केले त्यांची किंमत रुपये.

१७४१॥

१०६८/- महात व गडेकरी व मोतादार जदीद ठेविले, त्यांचा तागाईत छ १५ साबान पावेतों मुदत माफक आकार, कलकत्यांहून माघारे जातां येकमहा दिल्हा तो मिळोन. रुपये.

९०. नूरेखान वलद पीरखान महात.

१३।-। शेखहुसेन वलद शेखइनायत गडेकरी.

२३॥।-। जहानखान वलद रुस्तुमखान मोतादार.

१८॥।=॥ महमदखान वलद हमीदखान मोतादार.

१०६८/-

९०॥।= हत्ती व घोडे यांस कलकत्यास जातां मार्गी चंदी, रतीब, व वैरण वगैरे खेरेदी करून चारिलें त्याची किंमत तागाईत छ १५ साबान पावेतों रुपये.

९९॥।=॥। हत्ती नग १ यास रतीब वगैरे इस्तगबील छ ९ जमादिलाखर मुदत माहे २८११ वजा येकूण तिसा रोज ८१ बाकी एकादशीस मजलींमुळें रतीब चारिला त्या सुद्धां मुदत माहे २८१० रुपये.

३०॥।=। घोडे २ यांस चंदी वगैरे मिळोन रुपये.

९०॥।=

७२॥= हत्ती व घोडे यांस लागवड सामान कलकत्याचें मुकामीं केलें त्यास खर्च रुपये.

---

133. Elephants, horses, and dresses of honor were sent as a present to General Shore of Calcatta in A. D. 1793—94. A. D. 1800-1801.

NATIONAL ARCHIVES OF INDIA

५०।।।= हत्ती नग १ यास गाशा व सरी सकलादी केली त्यास रुपये.

२१।।।= घोडे २ यांस. रुपये.

७२।।=

७० हुंडणावळ पुण्यांत लाला काशमरी याचें दुकानीं दोन हजार रुपयांची हुंडी कलकत्याची करून घेतली त्यास हुंडणावळ पडली ते रुपये.

२०८१०=

पैकीं वजासूट मखलासी समयीं घातली ते रुपये ११०=.

बाकी रसानगीयाद. रुपये २०७०.

दोन हजार सत्तर रुपये तसलमात लाला चिमणलाल कारकून शिलेदार याचे तसल मातीस छ २६ जिलकाद सन सीत तिसेनांत अखेर सालीं पोतापैकीं सदरहु रुपये खर्च पडले आहेत, ते जमा धरून देविले. रुपये.

१३४।१९८ इंग्रजाकडील पलटणे सहा सरकार तैनातीस ठेऊन त्यांचे खर्चास सवीस लक्ष रुपयांचे महाल नांवनिशीवार गुजराथ व कर्नाटक मिळोन अलाहिदा इंग्रजी लिपीचें यादीवर शिक्का केला आहे. त्यांत सवीस लक्ष रुपयांचे बेरजेचे महाल ठरले आहेत, त्यांपैकीं गुजराथेंतील व कर्नाटकाचे महाल यादींत नेमले आहेत. त्या शिक्क्याचे यादीपैकीं इंग्रज आपला अंमल बसवितील त्यास तुह्मीं अडथळा न करणें. ज्या ज्या महालीं अमल बसवितील तेथें बसूं देणें आणि अमक्या महालांत अंमल बसविला ह्मणोन हुजूर विनंति लिहून पाठवणें. ह्मणजे अलाहिदा शिक्क्याचे यादीवरील व तुमचे लिहिणें येईल त्या महालास ताळा पहावयास येईल ह्मणोन सनदा.

इ० स० १८०२–०३ सल्लास मया तैन व अलफ. जिल्हेज १४.

१ खंडेराव निळकंठ सरसुभा प्रांत गुजराथ यांस गुजराथेंतील महालाविसी.

१ समस्त सरदार महालानिहाय प्रांत कर्नाटक यांस कर्नाटकचे महालाविसी.

२

रसानगीयादी.

134. It was settled that the English should keep 6 battalions for service under Government and that they (the English) should be given a territory worth Rs. 26 Lacs in Guzerath and Karnatic as detailed in a separate memo in English. Orders were issued to the officers of Guzerat and Karnatik to allow the English to occupy the territory specified in the memo.

A. D. 1802-1803.

NATIONAL ARCHIVES OF INDIA

१३५।१६३ इंग्रजांकडील पलटणें सहा सरकार तैनातेस ठेऊन त्यांचे खर्चास सवीस लक्ष रुपयांचे महाल नांवनिशीवार गुजराथ व कर्नाटक मिळोन अलाहिदा इंग्रजी लिपीचे यादीवर शिक्का केला आहे, त्यांत सवीस लक्ष रुपयांचे बेरजेचे महाल ठरले आहेत. त्यांपैकीं गुजराथेंतील महाल यादींत नेमले आहेत. त्या शिक्कयाचे यादीपैकीं किल्ले पारनेरा प्रांत मजकूर व महाल येथें इंग्रज आपला अमल बसवितील. त्यास मशार निल्हेचे स्वाधीन किल्ला करून कबज घेणें म्हणोन. सनदा.

इ० स० १८०३-०४ आर्बा मया तैन व अलफ रबिलाखल ७.

१ किल्ले मजकूर निसबत गोविंदराव कृष्ण यांस.

१ हवालदार व कारकून किल्ले मजकूर यांस.

१ परगणें मजकूर निसबत धोंडोराम यांस.

३

रसानगीयाद.

१३६।१६७ सरकारचा व कुंपणी इंग्रज बहादूर यांचे सरकारचा तह वसईचे मुकामीं सालगुदस्ता सनसल्लास मया तैनांत जाहला, ते समयीं कुंपणी इंग्रज बहादूर यांचे सरकारचीं पलटणें सरकारांत चाकरीस ठेविलीं त्यांचे खर्चास प्रांत गुजराथपैकीं परगणें उरपाड वगैरे महाल व प्रांत कर्नाटक येथील प्रांत सावनूर वगैरे महाल मिळोन सवीस लक्ष रुपयांचे बेरजेचे ला-

इ० स० १८०३-०४ आर्बा मया तैन व अलफ. जमादिलाखर. १८.

---

135. The fort and amal of Parnera in Guzerath were included in the territory worth Rs 26 lacs assigned to them(Englsh) in consideration of their placing 6 battalions at the disposal of Government. Orders were now issued for the surrender of the fort and Mahal in question.

A. D. 1803-1804.

136. It was agreed at the treaty of Bassein concluded in the preceding year with the English that the Peshwa should hand over a territory worth Rs. 26 lacs to the English in consideration of the latter placing 6 battalions at his disposal. Pargana Urpad &c in Guzerath and Prant Sawnur &c in Karnatik worth in all Rs 26 lacs were accordingly made over to the English. A portion of this territory worth Rs. 1916000 was now with the consent of the English taken back by Government. and in lien there of a portion of the territory in Bundelkhand surrendered by Ali Bahadar &c. worth Rs. 1916000 was given to them in Saranjam.

A. D. 1803-1804,

Additional territory in Bundelkhand was also given for the following reasons

worth Rs. 50000. In consideration of the revenue realized from pargana Urpad taken back by Government.

75000 In consideration of the English keeping 1000 Sawars for service under the Peshwa.

500000 In consideration of the English agreeing to pay the expenses of 5000 men entertained by the Peshwa for assisting the English till the close of the war.

NATIONAL ARCHIVES OF INDIA

ऊन दिल्हे होते. त्यांपैकीं परगणें उरपाड प्रांत गुजराथ व प्रांत कर्नाटक येथील प्रांत सावनूर वगैरे महाल येकुणीस लक्ष सोळा हजार रुपयांचे बेरजेचे दरोबस्त कुंपणी इंग्रज बहादूर यांचे विचारे पुणीयाचे मुक्कामीं सरकारांत माघारे घेतले. त्याचे मोबदला व जाजतीकलमाबद्दल मिळोन प्रांत बुंदेलखंडाकडे अलीबहादर यांणीं नवा मुलूख सरकारांत सोडविला त्यांपैकीं कुंपणी इंग्रज बहादूर यांजकडे सरंजामास द्यावयाचा करारांत आला त्या प्रमाणें बेरीज रुपये

१९१६००० पलटणचे खर्चास वसईचे मुक्कामीं सवीस लक्ष रुपयांचे बेरजेचा मुलूख सरकारांतून लाऊन दिल्हा त्यांपैकीं कुंपणी इंग्रज बहादूर यांचे विचारें परगणें उरपाड प्रांत गुजराथ व प्रांत कर्नाटक येथील प्रांत सावनूर वगैरे महाल दरोबस्त सरकारांत घेतले. त्यांचे मोबदला पलटणचे खर्चास मुलूख लाऊन द्यावयाची बेरीज रुपये.

१७००००० हल्लीं जाजती कलमाबद्दल बेरीज रुपये

१००००० परगणें उरपाड प्रांत गुजराथ हा महाल सरकारांत माघारा घेतला त्यास उरपाडचे वसुलामुळें जाजती मुलूख द्यावयाचा तो. रुपये.

७९०००० तुरकस्वार १००० येक हजार जदीद कुंपणी इंग्रज बहादूर यांजकडील सरकारांत चाकरीस ठेवावें. त्यांचे बेगमबिदल सालीना कूलतनखा सदरहु येक हजार स्वारांची चाकरीची नेमणूक सरकारांतून होईल तेथें करावी. त्याबद्दल रुपये.

५००००० वसई मुक्कामीं तहनामा जाहला त्यांत पंधरावें कलमांत लिहिलें आहे कीं, लढाईचे प्रसंगीं दहा हजार स्वार व सहा हजार पायदळ वगैरे सरंजाम लढाईस द्यावा त्याही वरता मगदूर करार करितात कीं ह्या फौजेशिवाय तामगदुर दारुगोळी सरंजाम देऊं, असें कलमांत आहे. तें महकूब होऊन हल्लीं करार ठरला कीं, पांच हजार फौज व तीन हजार पायदळ कुंपणी इंग्रज बहादुर यांचे कुमकेस द्यावें, याचा तनखा सरकारांतून पावत जाईल. या खेरीज मसलत अखेर पावेतों पांच हजार मराठी फौज सरकारांत चाकरीस ठेवावी. त्याचा तनखा कुंपणी इंग्रज बहादूर यांचे सरकारांतून देत जावा. त्याजबद्दल मुलूख द्यावयाचा तो.

(The 15th article in the treaty of Bassin which stipuleted that the Peshwa should send 10000 Sawars and 6000 soldiers for assistance to the English in times of war was cancelled and he was now to furnish only 5000 Sawars and 3000 soldiers.)

400000 In consideration of the expenses required for restoring peace and order in Bundelkhand.

Rs. 1700000

Thd total value of the territory surrendered was Rs. 3616000.

NATIONAL ARCHIVES OF INDIA

४००००० बुंदेलखंडाकडील प्रांतांत शरारतवाले बखेडा करून मुलखाची खराबी करितात. त्यास तंबी करून मुलखाची असुदी व अबादी करावी. त्याचे खर्चाबद्दल मुलूख द्यावयाचा तो रुपये.

१७००००

३६११०००

येकूण छतीस लक्ष सोळा हजार रुपयांचे बेरजेचे महाल कुंपणी इंग्रज बहादूर यांजकडे नेमून देविले असेत, तरी सदरहु रुपयांचे महाल यांचे हवालीं करणें म्हणोन कारकून दिमत अली बहादर यांचें नांवे सनद १.

परवानगीरुवरु.

जमा जामदारखाना.

१३७।१६८ कमावीस भेट राजश्री खासा यांस, बरहुकूम कर्नेल कलोष (क्लोज) वकील दिमत इंग्रज कलकत्तेकर यांणीं इदीची मिठाई पाठविली त्याज बरोबर सनगें पाठविलीं, तीं गुजारत येसाजी पवार सिंदा पोरगा. सनगें येकूण किंमत रुपये.

इ० स० १८०३-०४ आर्या मया तैन व अलफ. रमजान २०.

१५ तिवट पैठणी.

२०० शालफर्दे चार १०० प्रमाणें.

४० शेले साधे, बंगाली चार २० प्रमाणें.

१२५ किनखाप काळा १ येकूण.

३८०

१३८।१६९. समुद्रांत फरासी जाहजांशीं व इंग्रजी जाहाजांशीं लढाई होऊन फरासी जाहाज इंग्रजांनीं शिकस्त करून मुंबईस धरून आणलें, त्याचा झाडा घेतां तीन सरदार फरासीसी बंदर संगमेश्वर तालुके रत्नागिरी येथें उतरून खुशकीवर आले आहेत, ते सरकारांत आणावें, म्हणोन खुषरोजी मोदी दिमत इंग्रज कलकत्तेकर यांणीं हुजूर विदित केलें. त्याजवरून हे सनद सादर केली असे, तरी फरासीसाकडील तीन असामी बंदर मजकुरीं उतरले अस-

इ० स० १८०३-०४. आर्या मयातैन व अलफ सवाल १४.

137. Presents were received fram a colonei agent of the English at Calcutta on account of Christmas.
A. D. 1803-1804.

138. There was a fight between an English and a French vessal at sea. The French vessal was captured by the Englisd and brought to Bombay. It transpired that three French officers of the ship had got down at port Sangameshwar in Taluka Ratnagiri. Khushroji Modi therefore requested on behalf of the English that they should be captured and brought before Government. The Mamlatdar of Ratnagiri was directed to trace them and to send them to Poona.
A. D. 1803-1804.

NATIONAL ARCHIVES OF INDIA

ल्यास यांची तुम्ही वाजवी चौकशी करून तीन असामी तेथें असल्यास बंदोबस्तानें हुजूर पोहोंचवून देणें, तेथून निघोन गेले असल्यास कोणीकडे गेले याचा पत्ता लागेल तेथवर लावून हुजूर विनंति पत्र लिहिणें. म्हणोन नारो रामचंद्र मामलेदार तालुके रत्नागिरी यांचें नांवें सनद १.

रसानगीयादी.

१३९।१७२. बद्दल देणें, पर दरबार खर्च, वसली (वेलस्ली) दिमत इंग्रज कलकत्तेकर यांस हिराबागेंत मेजवानी केली, सबब सनगें दिल्ही त्यांची किंमत गुजारत खंडेराव निळकंठ. रुपये.

इ० स० १८०३-०४ आर्बा मयातेन व अलफ जिल्हेज २२.

रसानगीयादी.

४८५	जनरल वसली यांस.		
	२९०	शालजोडी केशरी	१ येकूण.
	१५०	किनखाप	१.
	४५	मलमली शेले	२ दर २२॥ प्रमाणें.
४८५			४
३७६॥	मेस्तर वायब.		
	२६२॥	शालजोडी दुसी	१.
	९०	किनखाप	१.
	२४	मलमली शेले	२ दर १२ प्रमाणें.
३७६॥			४
३६१॥	कर्णेल कोलमन.		
	२६२॥	शालजोडी सफेत	१.
	७५	किनखाप	१.
	२४	मलमली शेले	२ दर १२.
३६१॥			४.
१८२	मेस्तर गुडविन.		
	१०५	शालजोडी	१.
	५३	किनखाप	१.
	२४	मलमली शेले	२ दर १२.
१८२			४

139. General Wellesly in the service of the English at Calcatta was given a feast by the Peshwa in Hirabag at Poona. Presents of clothes were made to the following persons on that occasion. The names of the English afficers to whom presents were made are given. Tbe total value of the presents was Rs. 3288.

A. D. 1803-1804.

NATIONAL ARCHIVES OF INDIA

२०६॥। मेजर इसदन. (इसदेल).
११२॥ शालजोडी. १.
७० किनखाप. १.
२४। मलमली शेले. २ दर १२८=.
२०६॥। ४.

१७४॥।= कप्तान बाकनेल.
१०५ शालजोडी हिरवी. १.
९३ किनखाप. १.
१६॥।= महमुद्या दर ८।=.
प्रमाणें सनगें २.
१७४॥।= ४.

१८०॥।= लफटन (लेफ्टेनेंट) ए. यंग.
११० शालजोडी. १.
५४ किनखाप. १.
१६॥।= महमुद्या. २ दर ८।=.
१८०॥।= ४.

१[illegible]॥। कप्तान नाकस. (नाक्स).
६५ शालजोडी. १.
५३ किनखाप. १.
१५॥। महमुद्या.
८।= प्रत. १.
७।८ प्रत. १.
१५॥।
१३३॥। ४.

१३४ कप्तान कॉमन.
६५ शालजोडी. १.
५५ किनखाप. १.
१४ महमुद्या. २ दर ७.
१३४ ४.

१३७॥ डाकतर वेल्स.
६५ शालजोडी. १.

NATIONAL ARCHIVES OF INDIA

९९ किनखाप. १.
१७॥ महमुद्या. २.
९. ८॥.
१३७॥ ४.

१३७॥।= मेस्तर इसकरल.
६९ शालजोडी. १.
९६ किनखाप. १.
१६।॥= महमुद्या. २ दर ८।=.
१३७॥।= ४.

१२८॥= मेस्तर कलोस. (क्लोज).
७५ शालजोडी. १.
३९ किनखाप. १.
१८॥= महमुद्या. २ दर.
१७॥।=.
१०॥।.
१२८॥= ४.

१३६॥ मेस्तर बिलगन.
६९ शालजोडी. १.
४९ किनखाप. १.
२२॥ महमुद्या. २.
११ ११॥.
१३६॥ ४.

२४७॥ गोविंदराव.
१४० शालजोडी. १.
२० तिबट. १.
७५॥ किनखाप. १.
१२ मुहमुदी -॥-
२४७॥ ३॥.

१७९ आपाराव.
१५ तिबट पैठणी. १.
१२९ शालजोडी. १.

NATIONAL ARCHIVES OF INDIA

३० किनखाप	-॥-
९ महमुदी	१
१७९	३॥
४९॥ रामराव	
१३॥ तिबट पैठणी	१
३६ शेला जाफरखानी	१
४९॥	२
१६॥= सुबराव	
१२॥= तिबट पैठणी	
२४ जाफरखानी	
३६॥=	
३२८८।=	६३

पैकीं वजा मखलासी समयीं सूट ।= बाकी ३२८८ रुपये.

तीन हजार दोनशे अठ्ठ्यायशी रुपये, परगणें जंबुसर प्रांत गुजराथ निसबत नरसिंगराव कृष्ण यांजकडे सालमजकूरचे रसदेचा ऐवज येणें त्यांपैकीं चैत्र शुद्ध पौर्णिमेचे हस्तयापैकीं दिधले.

१४०।१७६. नारायणराव रामचंद्र यांस सरकारांतून कलकत्त्यास कामगारीस रवाना केलें आहेत, त्यांजबरोबर तुम्हांकडील सरंजामी फौजेपैकीं स्वार असामी येकशें देविले असेत, तरी येकशें स्वार चांगले यांचे दरमाहाची बेगमी करून मशारनिल्हेचे हवालीं करून देऊन, हे कामगिरीहून माघारे येत तोंपावेतों लिहिल्याप्रमाणें येकशें स्वार त्यांजवळ असों देणें. म्हणोन रघुनाथराव बळवंत यांस सनद १.

इ० स० १८०३-०४ आर्वा मयातैन व अलफ, सफर १९

रसानगी यादी.

१४१।१७७. १३२२ बदल. वसली जनराल (जनरल वेलस्ली) दिमत इंग्रज कलकत्तेकर यांचे डेऱ्यास स्वारी गेली, तेथें सनगें आलीं तें छ २४ सफर.

इ० स० १८०३।०४ आर्वा मयातैन व अलफ सफर २५

८९२॥ राजश्री बाबासाहेब यांस. जमा गुजारत त्रिंबकजी डेंगळे हस्तें राघोजी गोरा. रुपये.

A. D. 1803-1804. 140. Narayanrao Ramchandra was sent on some mission to Calcutta.

A. D. 1803-1804. 141. Presents were received from General Wellesley on the occasion of the Peshwa's visit to him in his tent.

NATIONAL ARCHIVES OF INDIA

२० तिवट पैठणी. १.
२०० शालफर्द २ दर १०० प्रमाणें रुपये.
७० शेले बंगाली कोरे २.

३० प्रत	१.
४० प्रत	१.
७०	२.

५० शेले साधे धुवट बंगाली बुट्टेदार २ दर २५ प्रमाणें.
३०० किनखाप. १.
२०० जामेवार जरी सफेद. १.

८४०	९

५२॥ सकलाद दुरंगी लाल काळी गज ३॥.
येकूण दर गजीं १५ रुपये प्रमाणें.

८९२॥	गज ३॥	९

४३६॥ राजश्री आपासाहेब यांस. जमा गुजारत रामजी जोरी खिजमतगार, सनगें येकूण किंमत. रुपये.
१२ तिवट पैठणी. १.
२०० शालफर्द २ दर १०० प्रमाणें रुपये.
१७९ किनखाप भरगची लाल. १
३२ शेले साधे. रुपये.

७ प्रत	१
२५ प्रत	१
३२	२

४१९

१७॥ सकलाद जुबर्दी, गज ३॥.
दरगजी ५ प्रमाणें.

४३६॥	३॥	६
१३२९	७	१५

NATIONAL ARCHIVES OF INDIA

रत्नशालेपैकीं.

१४२।१८१. देणें. दिमंत इंग्रज कलकत्तेकर यांस निरोप समयीं विद्यमान खासा.
इ स. १८०४।०५ सदरेस रुबरु पाहून दिल्हे. किंमत. रुपये.
खमस मया तैन व अलफ
रबिलावल १४

१३७८।- ऐन.
८४४॥-। सवाई.
४२२२॥=। जडाव दागिने.

५ जनराल वेसली (जनरल वेलस्ली) यांस. किंमत रुपये.
२७११॥=- ऐन.
६७७॥=। सवाई.
३३८९॥-।- दागिने.

येकूण
१ शिरपेंच घाट साधा, तीन फुलांचा किरणाचा, बाबद नरसिंह खंडेरावपैकीं. रुपये.
४५० ऐन.
११२॥ सवाई.
५६२॥ शहत.
७९ हिरे, हिरकण्या.
४ माणकें.
१ पाचमणी लोलक.
८४
१ जगो घाट साधा, बदल खरेदी गोपाळशेट सोनारपैकीं किंमत रुपये.
४६० ऐन.
११५ सवाई.
५७५ शहत

A. D. 1804-1805. 142. Jewelry worth Rs. 4222 was presented to General Wellesley and others at the time of their farewell visit to the Peshwa.

NATIONAL ARCHIVES OF INDIA

७४ हिरे हिरकण्या मदनाईकसुद्धां.
१ मोतीं लोलक.

७५

१ तुरा मोत्यांचा, बाबद खरेदी वजीरचंद जोहरी पैकीं छ मजकुरीं खरेदी केला. किंमत रुपये.
६८९ ऐन.
१७२। सवाई.

८६१।

४५९ मोत्यें वजन टांक १२॥ ४।- चव ११५॥-॥ येकूण सर १७ दर सरास २७ प्रमाणें दाणे.
१ दांडीरुपें मुलामा सोनें, व फुदण्यास मुकेस (?).

४६०

१ कंठीं मोत्यांची, बदल सखाराम घाटगे पैकीं किंमत रुपये.
९१७॥- ऐन.
२२९।=। सवाई.

११४७।-।

शहत.

१० धुगधुगी, घाट साधा शहत.

सुमार.

९ हिरे व हिरकण्या.
१ मोतीं लोलक.

१०

५० मोतीं माळेस वजन टांक ५७॥. चव १६७॥- एकूण.

६०

१ आंगठी हिऱ्याची, घाट मिनेगार मिना हिरवा व निळा व सफेद, बाबद भेट सावळ भक्ति साहुकारपैकीं, किंमत रुपये.
१९५ ऐन.
४८॥। सवाई.

२४३॥।.

शहत.

NATIONAL ARCHIVES OF INDIA

१ हिरा, अष्टपैलु, वजन रती १॥ एकूण.
० सोनें.
१
५

२ मेजर मालकम यास. किंमत रुपये.
६६६॥ ऐन.
१६६॥= सवाई.
८३३४=
दार्गाने.

१ शिरपेंच, घाट साधा तीन फुलांचा रुप्याचें किर्णाचा. बदल दादाजी व्यंकाजी साहुकार पैकीं किंमत रुपये.
४२९ ऐन.
१०६। सवाई.
५३१।
शहत.

९३ हिरे व हिरकण्या.
५ माणकें.
४ पातास (पानास)
१ लोलक
५
९८

१ जगो घाट साधा, बदल वेंकाजी दादाजी साहुकारपैकीं किंमत रुपये.
२४१॥ ऐन.
६०।= सवाई.
३०१॥।=
शहत.

५८ हिरे, हिरकण्या, मदनाईक, मुद्दां

NATIONAL ARCHIVES OF INDIA

१ पाचमणी लोलक रती २।८

५९

२

७

१४३।१८४ जनरल वलजली (वेलस्ली) बाहादूर यांणीं बापूजी गणेश गोखले यांजकडे तालुके सावनूर वगैरे सरकारचीं ठाणीं गैर सनदी होतीं, तीं पंधरा दिवसांत खालतीं करून तुमचे स्वाधीन करावीं, व तुह्मांकडून रुपये ३३०००० तीन लक्ष तीस हजार रुपये दीडा वर्षाचे मुदतीनें मशार निल्हेस देविले, या मजकुराचे ठरावाची याद तुमचीं व गोखले यांची जनराल यांचे विद्यमानें जाहली, तिची नक्कल जनरलांनी कर्नेल कलोश वकील दिमत कुंपणी इंग्रज बहादुर यांजकडे पाठविली, वकील महसुफ यांणीं सरकारांत गुजरविली त्यावरून समजलें. त्यास गोखले यांणीं कशाचा ऐवज जनरलांस समजाऊन तुह्मांकडून घेतला, हा जाबसाल गोखले पुणीयास आलीयावर मनास आणितां येईल. जनराल बहादुर यांणीं पंधरा दिवसांत गोखले यांजकडून सावनूर वगैरे ठाणीं तुमचे स्वाधीन करवून तीन लक्ष तीस हजार रुपये तुह्मांकडून दीड वर्षाचे मुदतीनें गोखले यांस देविले त्याप्रमाणें पंधरा दिवसांचे आंत सावनूर वगैरे ठाणीं तुम्हीं आपले स्वाधीन करून घेऊन तीन लक्ष तीस हजार रुपये गोखले यांणीं ज्या सावकारास वगैरे देविले असतील, त्यांची निशा दीड वर्षाचे मुदतीनें करून देणें. म्हणोन केशवराव बाळकृष्ण मामलेदार सरसुभा प्रांत कर्नाटक याचें नांवें. सनद १.

इ० स० १८०४–०५ खमस मया तैन व अलफ. रबिलाखर १९.

रसानगीयादी.

१४४।१९० हरि उद्धव यांस सरकारांतून वकिलीचें कामाकरितां कऱ्हाडास पाठविले आहेत. त्यास मशारानिल्हे तेथें पोहोंचल्यावर त्यास वकीली संबंधी माहितगारी आठा चौरोजांत करून देऊन तुम्हीं निघोन हुजूर येणें म्हणोन लाला गुलाबराय याचे नांवें चिटणीसी पत्र.

इ० स० १८०४–०५ खमस, मया तैन, व अलफ. रमजान २६.

---

143. It was settled through General Wellesly that Bapuji Ganesh Gokhle should restore to Keshavrao Balkrishna Mamlatdar Sirsubha of Karnatic, Talooka Sawanoor and other Government territory unauthorizedly held by him and that Keshavrao should pay to Bapuji Gokhle Rs. 330000 in a year and a half. An agreement was drawn up to the above effect and a copy of it was sent by General Wellesly to the English agent at Poona, who sent it on to Government. Government had no information as to why the sum of Rs. 330000 was demanded by Gokhle. Inquiries were to be made on the point on Gokhle's arrival at Poona. In the meanwhile the agreement was ordered to be given effect to.

A. D. 1804-1805.

144. Hari Udhav was appointed Government agent at Calcutta in place of Lala Gulabray. The latter was directed to give the necessary information regarding the duties of the office to Hari Udhav in a week and to repair to Poona.

A. D. 1804-1805.

NATIONAL ARCHIVES OF INDIA

१४५।१९३ देणें, सार्जे मिसमिकीन रिकार्डर कोडदचा (कोर्टाचा) मुखत्यार दिमत इंग्रज कलकत्तेकर मुंबईस राहतात, ते वाड्यांत भेटीस आले सबब विद्यमान राजश्री बाबासाहेब, रुबरु पाहून दिल्हे. ते किंमत. रुपये.

इ० स० १८०५-०६ सीत मया तैन व अलफ. सवाल ७.

१४७९।- ऐन किंमत.
३६९॥।-। सवाई.

१८४८॥।-।

जडाव दागीने.

१ शिरपेंच, घाट साधा तीन फुलांचा किर्णाचा, बदल शामराव लक्ष्मण रास्ते पैकीं. किंमत. रुपये.

२३० ऐन किंमत.
५७॥ सवाई.

२८७॥

---

८२ हिरे व हिरकण्या.
१ माणिक मदनाईक.
१ मोती लोलक.

८४

१ जगो, घाटसाधा, बदल खंडेराव निळकंठ रास्ते पैकीं, किंमत. रुपये.

३२५ ऐन किंमत.
८१। सवाई.

४०६।

---

६८ हिरे व हिरकण्या.
१ मोती लोलक.

६९

१ कंठी मोत्यांची, बदल बापूजी गणेश गोखले पैकीं, किंमत. रुपये.

९२४।- ऐन किंमत.
२३१।- सवाई.

११५५।-।.

---

145. An English judge at Bombay having came to pay a visit to the Peshwa, present of jewelry worth of Rs. 1848 was made to him.
A. D. 1805-1806.

NATIONAL ARCHIVES OF INDIA

१० धुगधुगी घाट साधा, शहत.
९ हिरे.
१ मोती लोलक.

१०

६० मोत्यें माळेस वजन टांक ६॥१॥

७०

३

१४६।१९७ कुंपणी इंग्रज बहादूर यांचे विद्यमानें सालसंबंधी इस्तकबिल मार्गशीर्ष मास
इ० स० १८०६।०७ सबा मयातैन व अलफ. मोहरम २ सालमजकूर सनसबा मयातैनापासून दोनलक्ष रुपये तुमचे कुलबाब खर्चास द्यावयाचे ठरले. त्यापैकीं रुपये.

९०००० मार्गशीर्षमासचे हप्त्याचे पेशजी देविले ते.
९०००० फालगूनमासचे हप्त्याचे हल्लीं देविले ते.

१००००० पत्र १.

येकूण येक लक्ष रुपये चांदवड देविले असेत, घेऊन पावली याचा जाब देणें, म्हणोन चिरंजीव राजश्री चिमणाजी रघुनाथ यांचेनावें फडणीसी

१४७।१९९ देणें, कर्णेल कलोष वकील दिमत इंग्रज कलकत्तेकर, यांस राजश्री बाबा
इ० स० १८०६।०७ सबा, मयातैन व अलफ साबान २६ साहेब यांचे लग्नाचा परत आहेर हिराबागांत केला. त्याजवर रुबरु पाहून दिल्हे. ते जडाव बाबत सदाशिव माणकेश्वर पैकीं, छ २८रविलावल सन सबा मयातैन आहेरावर आले. ते किंमत २०५२।=॥ रुपये.

जडावदागीनें

१ शिरपेंच, घाट साधा तीन फुलांचा किंमत रुपये २९०.

शहत

५५ हिरे व हिरकण्या किंमत रुपये २४३.
१ मोतीं लोलक मजीद. रुपये १२.
० सोनें वे अजुरा किंमत रुपये ३५.

५६

146. It was agreed through the agency of the English that Government should pay annually Rs. 2 Lacs to Chimnaji Raghunath from the current year.
A. D. 1806-1807.

147. A return present consisting of jewelry was made in Hirabag to the English agent at Poona on the occasion of the Peshwa's marriage.
A. D. 1806-1807.

NATIONAL ARCHIVES OF INDIA

१ जगो, घाट साधा किंमत. रुपये ३१५

शहात.

५९ हिरे व हिरकण्या, किंमत रुपये २७२॥.
१ मोतीं लोलक, रुपये ८
० सोनें, व अजुरा किंमत रुपये. ३४॥
६०

१ कंठी मोत्यांची, किंमत रुपये १४४७।=॥.

शहात.

१० घुगघुगी, घाट साधा किंमत रुपये ८५

शहत.

९ हिरे.
१ मोतीं लोलक. रुपये १५.
सोने व अजुरा. रुपये ७॥.
१०

४८ मोत्यें, माळेस किंमत १३६२।=॥ रुपये.
५८

३

१४८।२०२ देणें, खुसरोजी मोदी दिमत इंग्रजकलकत्तेकर यांस निरोप समयीं, विद्यमान राजश्री बाबासाहेब यांणीं सदाशिव रघुनाथ गद्रे यांचे वाड्यांत रुबरु पाहून दिला. तो शिरपेंच, घाटसाधा तीन फुलांचा बाबत नरसिंह खंडेराव पैकीं छ २८ रविलावल सबा मयातैनात आला. तो किंमत रुपये १२५.

इ० स० १८०६-७ सबा मयातैन व अलफ मोहरम ८

शहत

५० हिरे व हिरकण्या.
६ माणकें चुणी.
१ पाचमदनांईक.
१ मोतीं लोलक.
० सोनें व अंजुरा.
५८

जडावडागिना,

148. A present of jewelry was made to Khushroji Modi in the service of the English on the occasion of his farewell visit to the Peshwa.

A. D. 1806-1807.

NATIONAL ARCHIVES OF INDIA

१४९।२२४ देणें, जनरेल चंपनी, (चापमन ?) दिमत इंग्रज कलकत्तेकर, शिरूरचे लष्करांतून येऊन मुंबईस जातात, सबब यांस हिराबागांत मेजवानी केली ते समयीं खाशांनीं रुबरु पाहून दिल्हें. छ १४ रोज किंमत रुपये.

इ० स० १८०९–१० अशर मैयातैन व अलफ सवाल १८

१२८३। ऐन किंमत.
३२०॥।- सवाई.

१६०४।-

जडाव दागिने.

१ शिरपेंच, घाट साधा, सिदोजीराव निंबाळकर सर लष्कर यांजपैकीं आहेरावर आला तो, छ २८ रबिलावल, सन सबा मयातैन किंमत. रुपये,

२७५ ऐन किंमत.
६८॥। सवाई.

३४३॥।-

शहत

७ पाचा व किर्डे रुपये २२.
५८ हिरे व हिरकण्या किंमत रुपये २००.
१ मोतीं लोलक, किंमत रुपये १८.
० सोनें व अजुरा रुपये ३५.

६६

१ जगो घाट साधा, बदल लाट ईलस दिमत इंग्रज विलायतकर यांजपैकीं, छ १५ रजब सन खमस मयातैन, किंमत रुपये.

४०६॥।- ऐन किंमत.
१०१॥= सवाई.

५०८॥

शहत.

४५ हिरे व हिरकण्या, किंमत २७०॥।- रुपये.
१८ पाचा व किर्डे, किंमत ७९॥= रुपये.
० सोनें व अजुरा, रुपये ५६।=

६३

---

149. An English in the service of the English at Calcutta who had come from the camp at Sirur and was proceding to Bombay was given a feast at Hirabag and presented with jewels worth Rs. 1604.

A. D. 1809-1810.

NATIONAL ARCHIVES OF INDIA

१ कंठी मोत्यांची, बद्दल रामचंद्र परशुराम यांजपैकीं छ. ८ रबिलाबल सनसब मयातैन, आहेरावर आली ती किंमत रुपये.

६०१।। ऐन किंमत.
१५०।= सवाई.

७५१।।।=

शहत.

८ धुगधुगी, घाटसाधा. किंमत रुपये.

शहत

७ हिरे व हिरकण्या.
१ मोतीं लोलक.

८

६४ मोत्यें माळेस.

७२

३

१५०।२३२ इंग्रज कलकत्तेकर यांजकडील खासगत जागाचे (जाहजाचे?) कामाकरितां कारखानदार, सरकारची तिजाई व जकात वगैरे बाब शिरस्तेप्रमाणें जी असेल ती देऊन, लांकडे सरकारकाराखान्याकडे ध्यावयाची असतील तीं खेरीजकरून, वांकडीं तिकडीं लांकडें सरकारचे उपयोगीं नसतील तीं, जो संतोषानें विकत देईल, त्याजपासून उदम्यास व रयतेस कोणेविसी उपद्रव न देतां, सालमजकूर सन इसने अशर मयातैनांत, येकसाला खुषखेरदी करावयासी तालुके वसई येथें पाठविणार त्यास अडथळा होऊं नये. येविसी तालुके मजकूर येथील मामलेदार यांस ताकीद जाहली पाहिजे, ह्मणोन मेस्तर अलपीष्टण वकील दिमत इंग्रज कलकत्तेकर यांणीं हुजूर विनंती केली. त्याजवरून हे सनद सादर केली असे. तरी इंग्रज कलकत्तेकर यांजकडील खाजगत जहाजाचे कामाकरितां कारखानदारास सरकारची तिजाई व जकात वगैरेबाब शिरस्तेप्रमाणें जी असेल ती देऊन व लांकडें सरकार कारखान्याकडे ध्यावयाची असतील तीं खेरीज करून वांकडी तिकडीं लांकडे सरकारचे उपयोगीं नसतील तीं संतोषानें विकत देईल, त्याजपासून उदम्यास व रयतेस कोणेविसी उपद्रव न देतां

इ. स. १८१०।११
हिंदे अशर मयातैन व अलफ जमादिलावल २

150. At the request of Mr. Elphinstone agent of the English at Calctta, the Mamlatdar of Bassein was directed to permit the ryots and merchants to sell to the English wood not useful for Government purposes in the current year. The wood was required by the English for their naval workshop.

A. D. 1810-11.

NATIONAL ARCHIVES OF INDIA

सालमजकूर सन इसने अशरमयातैनांत येकसाल खुष खरेदी करून ते आपले तालुक्यांत नेतील त्यांस नेऊं देणें. ह्मणोन परशुराम खंडेराव मामलेदार तर्फ वसई यांस सनद १.

रसानगीयादी.

१५१।२४६ इंग्रज कलकत्तेकर यांजकडील लष्कर ह्या प्रांतीं आहे. तिकडे घोड्यांस चंदीस हरभरे विकत मिळत नाहींत. उमरखेड माहालांत हरभरे मिळतात याजकरितां परगणें मजकुरीं हरभरे खुषखरेदी करून दहा हजार पर्यंत बैल भरून लष्करांत नेऊन त्याची जकात सालमजकुरीं एक साला मात्र माफ केली पाहिजे, ह्मणून मेस्तर अलफिष्टन, वकील इंग्रजाकडील यांणी हुजूर विनंती केली. त्यास इंग्रजाकडील लष्कर त्या प्रांती आहे तेथें घोड्यास चंदीस हरभरे विकत मिळत नसल्यास उमरखेड माहालांत हरभरे हे खासगत खुष खरेदी करून दाहाहजार बैलापैकीं जे बैल भरून सालमजकूरीं येकसाला लष्करांत नेतील. त्यास परगणें मजकूरचा सालाबाद जकातीचा ऐवज जमेस येतो त्यांत नुकसान न येतां मदरहु बैलापैकीं जे बैल भरून जातील त्या जकातीविसी साल मजकूरी येक साला मात्र तगादा न करणें. ह्मणून सदाशिव माधवराव कमाविसदार परगणें उमरखेड यांचे नांवें. सनद १.

इ० स० १८१४।१८१५. खमस अशर मयातैन व अलफ सवाल १२

१५२।२४८ गोपाळ नागनाथ यांस कीं, सरकारांतून तुमचे तीर्थरूप नागो शिवराम चिनापटणास वकीलीचे कामावर होते ते मृत्यु पावले. सबब हें पत्र तुह्मांस सादर केलें असे, तरी तुम्ही सरकार लक्ष एकनिष्ठपणें ठेऊन गवरनर येलीयट (इलियट) दिमत इंग्रज कलकत्तेकर चिनापटणास आहेत त्यांजवळ राहून तेथील बातमी वरचेवर लिहित जाणे. म्हणोन चिटणीसीपत्र १.

इ०स० १८१६।१७ सबा अशर मया तैन व अलफ जिल्काद २०

१५३।२५० कुंपणी इंग्रज बहादूर याजकडील कारकून किल्ले महिमानगड नजीक कोंडी घाटाजवळ अखबरेचे कामावर आहे; त्याजकडील चार असामी जासूद किल्लेमजकुरचे मामलेदार यांणी पाहऱ्यांत बसऊन कारकुनास कैद करावयाकरितां लोक पाठविले, म्हणोन हुजूर विदित

इ०स० १८१६।१८१७ सदा अशर मयातैन व अलफ जमादिलावल २५

---

151. At the request of Mr. Elphinstone the Kamavisdar of Umarkhed was directed to allow the English to purchase gram for the army which was in that province as it was not procurable in the neighbouring district and to remit the duty on the removal of the gram to the extent of 10000 bulock loads.

A, D. 1814-15.

152. Nago Sivram agent at the court of the English Governor Chinapatan having died his son, Gopal Nagnath was appointed in his place and was directed to communicate news frequently to Government.

A. D. 1816-17.

153. A Carkoon was kept by the Englieh at Kondi ghat near Mahimangad for obtaining intelligance. His messengers were kept in confinement by the Government Kamavisdar and men were sent by him to arrest the karkun. The Kamavisdar was directed to release the messengers and to allow the karkun to remain at the Ghant for a year

A. D. 1816-17.

NATIONAL ARCHIVES OF INDIA

जाहलें त्याजवरून हे सनद सादर केली असे, तरी कुंपणी कडील जासूद पाहन्यांत तुम्ही ठेविले असल्यास व कारकुनास अटकावलेला असल्यास सोडून देणें. व अखबरीचें कामावर कारकून कोंडीघाटाजवळ राहतील त्यांस सालमजकुरीं येकसाला अडथळा न करणें. म्हणोन आत्माराम लक्ष्मण कमाविसदार तालुके महिमानगड यांचें नांवें सनद १.

रसानगीयाद.

राजकीय (ब) इतरमाहिती.

(२३) युरोपांतील राष्ट्रें.

१५४।२६ कमावीस भेट, बाबद फिरंगी गोवेकर यांजकडील वकील विठ्ठल गोरक्ष घेऊन आले ते गुजारतहाय सनंगें येकूण. रुपये.

इ. स. १७९६।९७
सबासेन मया व अलफ.
रमजान १.

३७३। राजश्री बाबासाहेब यांसी गुजारत माहादजी धुला खिजमतगार.

सनंगें येकूण रुपये.

२९० मुसेजरे.

२१० प्रत ३ दर ७०

४० प्रत, १

२९० ४

१२२ मखमल गज १७ ४३

दरगजी रुपये ७४२ प्रमाणें रुपये

१। जापता (तापता) सनंग ४-

३७३। सनंगें ४४- गज १७४३

२३१। राजश्री अमृतरावसाहेब यांसी गुजारत कृष्णाजी काळा खिजमतगार.

सनंगें येकूण रुपये.

२०० मुसेजरे.

१४० प्रत २ दर ७०

६० प्रत १

२०० ३

३० गुलबादज १

A. D, 1796-97. 154. Present of clothes was received by Bajirao from the Portuguese of Goa.

NATIONAL ARCHIVES OF INDIA

१। तापता सनंग ८८

२३१। ४८८

६०४॥ सनगें ८८९ गज १७८३

१५५।८३ फिरंगी गोवेकर यांस दमणचे सरंजामास सरकारांतून परगणें नगर हवेली प्रांत रामनगर तालुके वसई हा माहाल जकात व मोहतर्फा व शिंगशींगोटीसुद्धां दरोबस्त दिल्हा. त्याप्रमाणें त्यांजकडे चालत आहे. त्यास जकात फतेपूर येथील नाक्यास फिरंगी यांजकडील प्यादा बसवून आपले हिशाची जकात घेतात, ती गंभीरगडचे हिशापैकीं घेतात म्हणोन मामलेदाराचा उपद्रव लागतो, व नाक्याच्या खटखटीकरितां जप्ती केली तेव्हां गुरें भांडीं व ऐवज मामलेदार यांनीं नेला, तो माघारा द्यावयाकरितां पेशजी सरसुभ्याहून सनद सादर झाली असतां दिल्हा नाहीं. म्हणोन विठ्ठलराव गोरक्ष वकील यांनीं हुजूर विदित केलें. त्यावरून हे सनद तुह्मांस सादर केली असे तरी पेशजी सरकारची सनद सादर झाली आहे, त्याप्रमाणें चालविणें. नवीन दिकत न करणें. फतेपूरचे नाक्यावर फिरंगी आपला प्यादा बसवून आपल्या हिशाची जकात घेतात त्याप्रमाणें घेऊं देणें. जप्तीमुळें गुरें, भांडीं, व ऐवज घेतला असेल तो माघारा देणें. येविसी फिरोन बोभाट न येई तें करणें. म्हणोन वामनाजी हरि मामलेदार यांचें नांवें

इ. स. १७९८।९९
तिसा तिसेन मया व अलफ
साबान ४

सनद १.

रसानगीयादी.

राजकीय (ब) इतर माहिती.

(२३) लहान लहान संस्थानें.

१५६।१७ रामचंद्र कृष्ण यांचे नांवें सनद कीं, राजे खंडणशाहा हटीयाराय, संस्थान ममडाई सरकार हांडे प्रांत नेमाड सुभा खानदेश यांजकडील दुर्गादास भवानी कारभारी यांणीं हुजूर येऊन विनंती केली कीं, राजे खंडणशाहा यांचे वडील बंधु राजे धाडशाहा, यांचें पुत्र राजे भारतशाहा यांचे नांवें संस्थान चालत असतां ते सन अर्बातिसेनांत मृत्यु

इ० स० १७९६–९७
सबातिसेन मया व अलफ
रविलाखर २

155. The Mahal of Nagar Haveli in prant Ramnagar in Taluka Bassein was given to the Portuguese of Goa, being the territory assigned for the expenses of Daman.

A. D. 1798-99.

156. Three villages belonging to Khandanshaha Raja Hatiyaray of Sansthan Mamdai in Sarkar Hande of Prant Nemad in Subha Khandesh having been wrongly appropriated by Ramchandra Krishna Bhuskute, the latter was directed to restore the villages to the former and Scindia Alija Bahadoor was instructed to see that the order was carried out.

A. D. 1796-97.

NATIONAL ARCHIVES OF INDIA

पावले. त्यास त्यांचे चुलते असतां राजे यांचें नकल जाहले. संस्थान चालवावयास कोणी नाहीं असें रामचंद्र कृष्ण भुसकुटे यांणीं सरकारांत गैरवाका समजाऊन संस्थान मजकुरची जप्ती करून घेतली, हें वर्तमान समजल्यानंतर राजे यांणीं आपल्यास हुजूर पाठविलें. आपण येऊन विनंति करून संस्थानचे जप्तीची मोकळीक करविली. ते समयीं भुसकुटे यांणीं संस्थानचा देहेझाडा सरकारांत समजाविला. त्यांत मौजे सामर्दा व मौजे उदराकछ तर्फ सौताडा व मौजे धुदकर्ण तर्फ जुनवाण्या येकूण तीन देहे आह्मांस इनाम दिल्हे आहेत, ह्मणोन मशारनिल्हे यांणीं समजाविले. त्यास पेशजी सन सीत सीतेनांत पंचवीस हजार रुपयांचा सरंजाम आम्हांकडे ठेऊन बरकड सरकारांत घेतला, ते समयीं सरकारांतून आज्ञा जाहली कीं यांत कोणास पेशजीगांव इनाम असल्यास पुढें चालऊं नयेत. ह्मणोन त्याजवरून भुसकुटे यांणीं आपले नांवचा तहनामा शिक्यानिशीं लिहून दिला. त्यांत इनाम गांवांविशीचा कांहींएक दाखला नाहीं. असें असतां मशार निल्हे यांस गांवचा लोभ न सुटे सबब खांडव्याचे मुक्कामीं राजे यांजकडील रामजीभाई कारभारी यांजला त्यांणीं मनस्वी तसदी देऊन राजे यांजकडे कांहीं ऐवज नसतां पंचेचाळीस हजार रुपयांचा कागद राजे भारतशाहा यांचे नांवाचा लिहून घेऊन त्यांत सरहू तीन गांव गहाण लिहून घेतले, आणि गांवचा उपभोग करतात. येविशी आम्ही उद्योग करीत गेलों परंतु जबरदस्तीमुळें उपाय नाहीं. त्यास गहाणपत्राचे पूर्वीच भुसकुटे यांचे ऐवजाचा झाडून फडशा जाहला. त्यांचे वगैरे कागदपत्र बजिन्नस आह्मांपासीं आहेत, ते ध्यानास आणून आमचे गांव आह्मांकडे देविले पाहिजेत, व भुसकुटे यांणीं गांवांचा उपभोग केला आहे, तो ऐवज आमचा आह्मांस देविला पाहिजे. ह्मणोन त्याजवरून तुह्मांस येविसीचें कागदपत्र तुह्मांपाशीं काय असतील ते सरकारांत समजाविणें म्हणोन पुशिलें असतां इनामपत्राच्या नकला मात्र दाखविल्या, या शिवाय गहाणपत्र वगैरे हिशेबाचे कागदपत्र आह्मांपाशीं कांहींएक नाहींत. जळाले, दर्‍यांत गेले, असें ह्मणतात. सबब राजे खंडणशाहा यांजपाशीं कागदपत्र पाहून पंचाईत मतें मनास आणितां तुमचा ऐवज राजे भारतशाहा यांजकडे येणें त्याचा झाडून फडशा गहाणपत्राचे पूर्वीच जाहला. त्याचे कागदपत्र बाजिन्नस आहेत. त्यांपैकीं चारशें अर्धा रुपयांचे पावतीचा मात्र दाखला नाहीं. असें असतां अलीकडे तुह्मीं गहाणपत्र रामजीभाई कारभारी यांजपासून राजे यांचे नांवें लिहून घेऊन सदरहू तीन गांवचें उत्पन्न घेतां हें अनन्वित दिसोन येतें. येविसीं कारभारी याचें पत्र बजिन्नस ते वेळचे आहे. त्यांत तुमचे गैर रीतीचें करण्याचा व बोलण्याचा मजकूर लिहिला आहे. सबब तुमचा ऐवज व गांवास गहाणाचा संबंध लागू होत नाहीं हल्लीं तुह्मीं गहाणपत्राचे ऐवजाचे भरण्याचा झाडा वगैरे हिशेब कांहींएक दाखवीत नाहीं. इनामपत्राच्या नकला मात्र दाखवितां त्यास तुह्मी जे गांव इनाम ह्मणतां तेच गांव तुम्हीं गहाण लिहून घेतलें तेव्हां इनामाविषयीं संबंध राहिला नाहीं. कदाचित इनामपत्रेंहीं असल्यास बातल पडलीं असें सिद्ध होतें. याजमुळें सदरहू तीन गांवांविशीं तुमचा वारसा इनाम किंवा गहाण या दोहींतून एकही पोंचत नाहीं असें ठरलें. सबब देहेहाय मौजे सामर्दा व मौजे उदराकछ तर्फ सौताडा व

मौजे धुदकर्ण तर्फ जुणवण्या एकूण तीन गांव राजे यांजकडे सरकारांतून द्यावयाचा करार करून हे सनद तुह्मांस सादर केली असे, तरी सदर्हू तीन गांव राजे यांचे दुमाला करून आजपर्यंत गांवचे उत्पन्नाचा ऐवज तुह्मीं घेतला आहे. तो माघारा राजे यांस देणें. ह्मणोन सनद.

दौलतराव शिंदे आलीजा बाहादर यांस सदरहू अन्वयें कीं, देहेहाय मजकूर राजे खंडणशाहा यांजकडे सरकारांतून द्यावयाचा करार करून रामचंद्र कृष्ण यांस गांवाविशी अलाहिदा सनद सादर केली आहे, तरी मशारनिल्हे राजे खंडणशाहा यांजकडे गांव द्यावयास दिक्कत करूं लागल्यास त्यांस ताकीद करून गांव राजे यांचे स्वाधीन करून गांवचा मागील वसूल घेतला आहे तो माघारे देविणें ह्मणोन. सनद.

२

रसानगी यादी.

१५७।१८. मोकदम देहेहाय, संस्थान ममडाई, सरकार हांडे, प्रांत नेमाड सुभा खानदेश, यांचे नांवें सनद कीं, देहे व जकातीचें नाकें बितपसील. कितादेहे. कितादेहे.

इ. स. १७९६।९७. सया तिसेन मया व अलफ रबिलाखर २.

× × × ×

येकूण देहे ब्यांणव व जकात नाकें राजे खंडणशाहा हटीयाराय संस्थान मजकूर यांचे वडील बंधु राजे धाडशाहा, यांचे पुत्र राजे भारतशाहा यांचे नांवें संस्थान व देदेहाय जकातीचाअंमल सुद्धां चालत होते. त्यास ते सन अर्बा तिसेनांत मृत्यु पावले. त्यांस त्यांचे चुलते असतां राजे यांचें नक्कल जाहालें, संस्थान चालवावयास कोणी नाहीं, असें रामचंद्र कृष्ण भुसकुटे यांणीं सरकारांत गैरवाका समजाऊन संस्थानाची जप्ती करून घेतली. तेव्हां राजे यांनीं आपलेकडील दुर्गादास भवानी हुजूर पाठवून जप्तीची मोकळीक करावयाविसीं विनंती केली. त्याजवरून सन अर्बा तिसेनांत संस्थानाचे जप्तीची मोकळीक केली, परंतु राजे खंडणशाहा यांचे नांवें संस्थान करार जाहालें नव्हतें. सबब हल्लीं संस्थान मजकूर व संस्थानसंबंधें सरंजाम पंचवीस हजार रुपयांचा तहनामा सन सीतसीतेनांत करून दिल्हा आहे त्याप्रमाणें यांचे नांवें करार करून देऊन हे सनद सादर केली असे. तरी देहेहाय ब्यांणव येथील अंमल व जकात नाकें येथील जकातीचा अंमल सदरहूप्रमाणें राजे यांजकडे रुजू होऊन सुरळीत देत जाणें ह्मणोन. सनद

157. Raje Bharat Shah son of Raje Dhadshah of Sansthan Hatyaray died in A. D. 1793-94 Ramchandra Krishna Bhuskute represented that the Raja had left no heirs and the Sansthan was attached. The deceased had however a brother named Raje Khandunshah who urged his claim to the Sansthan and attachment therefore removed in the same year. A formal Sanad conferring the Sansthan and the Saranjam worth Rs. 25000 attached to it as agreed upon in A. D. 1765-66 was now issued, and Khandunshah was exhorted to act loyally towards Government.

A. D. 1796-97.

NATIONAL ARCHIVES OF INDIA

राजे खंडणशाहा हटीयाराय संस्थान ममडाई यांस कीं, संस्थान मजकूर व संस्थानसंबंधें सरंजाम तुमचे नांवें सदरहूप्रमाणें करार करून दिल्हा असे. तरी संस्थानाची सरकार लक्ष राखोन वहिवाट करीत जाणें. म्हणोन सनद.

२

रसानगी यादी.

१७८।८९. विक्रमशाहा राजे संस्थान जवार यांचे तीर्थरूप पतंगशाहा राजे यांजकडे संस्थान आहे. त्यास ते मृत्यु पावले सबब तुमचे नांवें संस्थान पेशजीप्रमाणें सरकारांतून करार करून देऊन हे सनद सादर केली असे, तरी तुम्ही सरकार लक्षांत राहून संस्थानाचा बंदोवस्त करून सुखरूप राहणें म्हणोन मशारनिल्हे यांचे नांवें सनद १.

इ. स. १७९८।९९. तिसा तिसेन मया व अलफ सवाल २४.

येविसी सदरहू अन्वयें पांडुरंग धोंडाजी यांस पत्र कीं, विक्रमशाहा राजे संस्थान जवार यांचे नांवें संस्थान पेशजीप्रमाणें सरकारांतून करार करून देऊन हें पत्र तुम्हांस सादर केलें असे, तरी हरएकविसी संस्थानचा उपराळा तुम्ही पेशजीपासून करीत आला त्याप्रमाणें करीत जाणें. म्हणोन चिटणीसी पत्र.

२

रसानगी यादी.

१७९।९० कृष्णशाहा जवारकर यांचा पुत्र याजपासून कांहीं अंतर जाहलें, सबब त्यास वसईस सरदारी करून नेहमीं सरकार चाकरी करून असावें, बाहेर येऊं नये. म्हणोन गणपतराव जिवाजी मामलेदार तालुके वसई यांचे नांवें चिटणीसी पत्र १.

१७९८ । ९९ तिसा तिसेन मया व अलफ सवाल २४

१६०।१०३ मोहनासिंग राजे संस्थान बडवाणी यांचें नांवें सनद कीं, तुम्हांकडील परमानंद मल्हार कारकून यांणीं हुजूर विदीत केलें कीं, उमेदसिंग राजे यांजकडे संस्थान मजकूर पेशजीपासून आहे. तेथील पेशकसी बाबद दरसाल सहा हजार रुपये सरकारांत देत होते. त्याजवर

इ०स० १७९९।१८०० मया तैन व अलफ सवाल २.

158. Patangshah Raja of Jawar having died his son Vikramshah was allowed to succeed him and was told to act loyally towards Government.

A. D. 1798-99.

159. Krishnashah Jawarkars' son being guilty of some misconduct was given a comand and directed to remain at Bassein. He had no permission to leave the place.

A. D. 1798-99.

160. Umedsing Raja of Sansthan Badwani used to pay Rs. 6000 as tribute to the Peshwa. On the transfer of certain Mahals in Sarkar Bijagad to Malharji Holkar in Saranjam the amount of tribute was paid by him to Holkar. Umedsing died and his son Mohonsing being a Minor the Holkar usurped the village of Bramhangam and some other villages and oppressed the Sansthan to a great extent. Parmanand Malhar a karkun of the Sansthan asked for Peshwas' help. Durgadas Bhawani was therefore sent to manage the Sansthan on behalf of the Raja and the following instructions were issued.

A. D. 1799-1800.

NATIONAL ARCHIVES OF INDIA

सरकार बिजागड पैकीं महाल मल्हारजी होळकर यांजकडे सरंजामास सरकारांतून दिले. त्यापासून पेशकसीचा ऐवज ते घेतात. अलीकडे उमेदसिंग राजे मृत्यु पावले. त्यांचे पुत्र मोहनसिंग हे लहान यांजमुळें संस्थानपैकीं परगणें ब्राम्हणगांव वगैरे गांव होळकर यांणी दाबून संस्थानांत मनस्वी उपद्रव करितात. व गीरास पूर्वीपासून आह्मीं घेत आलों त्याप्रमाणें महालकरी देत नाहींत. त्यास संस्थान मोहनसिंगराजे यांचे नांवें करार करून देऊन सरकारांतून संस्थानचा बंदोबस्त करून दिला पाहिजे. ह्मणोन त्याजवरून तुमचे तीर्थरूप उमेदसिंगराजे संस्थान मजकूर हे मृत्यु पावले. सबब तुमचे नांवें संस्थान पूर्ववतप्रमाणें करार करून देऊन संस्थानचे बंदोबस्तास सरकारातून दुर्गादास भवानी यांस पाठविलें आहेत त्यासंबधें कलमें.

संस्थान संबंधें तुम्हांपासून सालमजकुरीं येक साल नजरेचा ऐवज सरकारांत घ्यावयाचा करार केला रुपये ७५००० पाऊण लक्ष रुपये याचा भरणा सरकारांत करून जाब घेणें. कलम १.

संस्थान संबंधें पेस्तरसालापासून शंभर स्वार घोडेमाणूस धडधडीत, सामान चांगलें, बराबर संस्थानांतील दाखल्याचा माणूस चांगला देऊन स्वाराचे तैनातेची बेगमी करून हुजूरचाकरीस नेहमीं पाठवीत जाणें. कलम १.

संस्थानचे कामकाजास सरकारांतून दुर्गादास भवानी यांस पाठविले आहेत. तरी तुह्मीं संस्थानचे कामकाज यांजपासून घेत जाणें. कलम १

पेशकसी बाबत साहा हजार रुपये सालाबाद पेशजी प्रमाणें पेस्तरसालापासून दरसाल सरकारांत पावते करून जाब घेत जाणें. कलम १.

संस्थानचे बंदोबस्तास स्वार व गाडदी दुर्गादास भवानी यांस ठेवावयाची आज्ञा केली आहे. तरी संस्थानचा बंदोबस्त होय तोपावेतों स्वार व गाडदी मशारनिल्हे ठेवतील, त्यांचे तैनातेचा ऐवज द्यावयाविसी आलाहिदा तुह्मांस सनद सादर जाली आहे त्याप्रमाणें देत जाणें. कलम १.

एकूण पांच कलमें करार करून देऊन हे सनद तुह्मांस सादर केली असे तरी तुह्मी सरकार लक्षांत राहून सदरहु प्रमाणें करणें ह्मणोन. सनद.

रसानगी यादी येकंदर.

११०।१०३ पैकीं. मोहनसिंग राजे संस्थान बडवाणी यांचे नांवें सनद कीं तुमचे तीर्थरूप उमेदसिंगराजे संस्थान मजकूर हे मृत्यु पावले. सबब तुमचे नांवें संस्थान पूर्ववतप्रमाणें करार करून देऊन संस्थानचे बंदोबस्ताचें काम दुर्गादास भवानी यांजकडे सांगितलें आहे. त्यास मशार

इ० स० १७९९।१८०० मया तैन व मया अलफ सवाल २.

1 The Raja should pay Rs 75000 as Nazar in the current year.
1 He should continue to pay tribute at Rs. 6000 as before.
1 He should send 100 Sawars to the Peshwa for service, their expenses being defrayed by the Raja.
1 Durgadas should be given the expenses of the force which he was directed to keep for service in the State.
1 The Raja was to let Durgadas to carry on the business of the Sansthan.

NATIONAL ARCHIVES OF INDIA

निम्हे व कारकून यांस तैनात व रोजमरा व संस्थानचे बंदोबस्तास स्वार व गाडदी ठेवावयाविसीं दुर्गादास भवानी यांस आज्ञा केली. त्याचे तैनातेचा वगैरे ऐवज संस्थान मजकूरपैकीं सरकार ऐवजाशिवाय द्यावा याविसीं कलमें.

बितपसील.

१ दुर्गादास भवानी यांस तैनात सालीना.

नक्त रुपये.	कापड आंख.
२५०० जातीस शागीर्द पेशासुद्धां.	१५००
१००० पालखीस.	
३५००	

येकूण साडेतीन हजार रुपये नक्त व कापड आंख पंधराशें तैनांत सालीना कुल करार केली असे; तरी मशार निल्हेस सदरहूप्रमाणें देत जाणें. कलम.

१ कारकून संस्थानचे बंदोबस्तास राहतील त्यांस.

रोजमरा दुमाही रुपये.	कापड सालीना आंख.
बाळाजो दुल्लभराम ५०.	३००.
चिमणाजी धोंडदेव ४०.	२५०.
बाळाजी येशवंत ४०.	२५०.
१३०	८००

येकूण येकशें तीस रुपये रोजमरा दुमाही व कापड आंख सालीना आठशें करार केले असेत; तरी हजेरीचे तेरखेपासून चाकरी बरहुकुम रोजमरा दुमाही येकशें तीस रुपये व कापड आंख सालीना आठशें सदरहू प्रमाणें देत जाणें. कलम.

१ स्वार असामी २२५ येकूण दर राऊती शेरा सालीना रुपये तीनशे शिरस्तेप्रमाणें करार करून तैनातपैकीं रोजमरा व नालबंदी.

रोजमरा दर राऊती दरमाहा	नालबंदी सालीना दर राऊती.
रुपये १८ प्रमाणें रुपये ४०५०	रुपये ७५ प्रमाणें १६८७५

येकूण चारहजार पन्नास रुपये रोजमरा येकमाही व सोळा हजार आठशें पंचाहत्तर रुपये नालबंदीची नेमणूक सालीना शिरस्तेप्रमाणें करार केली असे; तरी घोडे माणूस सामान चांगलें ठेऊन संस्थानचा बंदोबस्त करावा. गणतीचे तेरखेपासून चाकरीबरहुकूम स्वारांचा रोजमरा व नालबंदीचा ऐवज बंदोबस्तामुळें होईल तो देत जाणें. कलम १

१ गाडदी असामी २२५ येकुण तैनात जमातदार व कारकून सुद्धां शेरा

NATIONAL ARCHIVES OF INDIA

सरासरी दर महा दर असामीस रुपये १४ प्रमाणें तैनात दर महा रुपये ३१५०.

तपसील.

२१००	रोजमरा तैनातपैकीं, वीस रोजा येकमाही. रुपये.
१०५०	तहकूब अखेर सालीं हिशेब करून द्यावें ते. रुपये.
३१५०	

येकूण तीन हजार एकशें पन्नास रुपये तैनात दरमाहा करार केली असे. तरी माडदी चांमले चाकरींचे उपयोगी पाहून ठेवावे. त्यांस हजिरीचे तेरखेपासून चाकरी बरहुकूम दरमाहा तैनात पैकीं वीस रोजा दोन हजार येकशें रुपये देत जाणें, तहकुबी एक हजार पन्नास रुपये प्रमाणें अखेर सालीं अकरा माही व येकूणतीसारोज वजा करून तैनातेचा हिशेब संस्थानचे बंदोबस्तामुळें होईल तो ऐवज देत जाणें. कलम.

४

येकूण चार कलमें करार करून हे सनद तुह्मांस सादर केली असे. तरी सदरहुप्रमाणें करणें म्हणोन. सवद १.

रसानगी करारांची यादी.

इ. स. १८०१।०२ इसन्ने मयातैन व अलफ, जिलकाद ९.

१६१।१४१. रूपदेराणा संस्थान रामनगर यांचे नांवें सनद कीं, तुह्मांवर सरंजामपट्टीबद्दल पन्नास हजार रुपयांची वरात जाली आहे. त्यास चार वर्षें होत आलीं त्याचा फडशा अद्यापि होत नाहीं, व सरकारचे मुत्सदी यांजकडे तुह्मांकडून देहेचार चालत आले होते त्यांची जप्ती तुम्हीं केली आहे, व सरकारच्या जकाती संस्थान मजकुरीं आहेत त्यांचे अमलाची कैदकानू वगैरे यांत बखेडा तुम्हीं करून पायमल्ली करीत आल्यामुळें नुकसानी जाली, व तालुके वसई येथील कारकून प्यादे यांसी बेकैदी केली, ह्मणोन हुजूर विदीत झालें. त्याजवरून सरसुभा प्रांत कोंकण येथून बाबुराव भास्कर यांस पाठविले असेत, तरी सरंजामपट्टीबद्दल वरातेचे ऐवजांचा फडशा करणें, विलंब न लावणें, व मुत्सदी यांस तुम्हांकडून गांव चालत होते त्यांची जप्ती तुम्हीं केली आहे ती मोकळी करणें, आणि गांवची कमाविस खंडेराव निळकंठ यांजकडे सरकारांतून सांगितली असे तरी गांव त्यांचे हवालीं करणें, हे

161. Acess called Saranjampatti amounting to Rs. 50000 was imposed on Rupde Rana of Sansthan Ramnagar. The Raja failed to pay the amount. He more over attached certain villages granted by him to the officers of Govt and interfered with the management of the octroi which was in the hands of Government. He was informed that if he did not pay the cess and the expenses incurred on account of his interference with the octroi management and if he did not restore the villages in question it would go hard with him.

A. D. 1801-1802.

NATIONAL ARCHIVES OF INDIA

गांवचा वसूल घेतील, दिकत न करणें व जकातीचे अमलांत बखेडा व कारकुनांशीं बेकैदी केल्यामुळें बाबुराव भास्कर यांचे विद्यमानें शिबंदी खर्च जाहला असेल त्याचा फडशा करून देणें, सदरहू कलमांचा लिहिल्याप्रमाणें फडशा न केल्यास तुमचें येकसुदीस चांगलें नाहीं म्हणोन.

रसानगीयाद.

इ० स० १८०९।१०
अशा मयातैन व अलफ
साबान ९

१६२।२२२ संस्थान वाडी निसबत खेमसांवत भोसले सरदेसाई प्रांत कुडाळ व महालानिहाय. मशारनिल्हे मृत्यु पावले याजमुळें संस्थानीं हौदा होऊन मुलूख खराब जाला. त्यास संस्थान सरकार निसबतीचे यास्तव सरकारांतून कारकून देऊन बंदोबस्त व्हावा. म्हणोन फोंड सांवत भोंसले यांणीं आनंदराव जाधव यांस गणेश चिंतामण घारपुरे यांचे विद्यमानें सरकारांत बोलण्यास पाठविले. त्यास जाधव व घारपुरे यांणीं वाडीचे संस्थानचा व्यवस्थेनें बंदोबस्त करून देण्याविसीं विनंती केली, त्याजवरून उभयतांचे बोलण्याचे भाव समजोन घेऊन सांवत यांजकडील वाडी संस्थान सरकार निसबतीचें सबब संस्थानचे माहाल व गांव व किल्ले व कोट व आरमार वगैरे सुद्धा बंदोबस्त करावयास हुजूरून गणेश चिंतामण घारपुरे कारकून पाठविले येविसी सनदा पत्रें.

१ करवीरकर यांस कीं, हे संस्थान मजकूर येथील महाल मुलूख व किल्ले कोट व आरमार, वगैरे सुद्धां बंदोबस्त करतील. त्यास साहेबाकडे संस्थान मजकुरचे माहाल व गांव व किल्ले व कोट व आरमार व तोफा वगैरे जें आलें असेल तें जकिरासुद्धां घारपुरे यांचे हवाली करावयाविसीं आज्ञा व्हावी. पुढें कोणेविसी मुलकांत उपसर्ग न लागे तें जालें पाहिजे म्हणोन. पत्र.

१ सिदोजीराव नाईक निंबाळकर सरलष्कर यांस कीं, प्रांत मजकुरीं तुम्हांकडील कारकून व लोक जाऊन गांवगन्ना व किल्ले यांस उपद्रव केला आहे, म्हणोन हुजुर विदित जालें त्याजवरून हें पत्र तुह्मांस सादर केलें असे. तरी संस्थान मजकुरचा माहाल व मुलुक किल्ले व कोट वगैरे सुद्धां बंदोबस्त मशारनिल्हे करतील, त्यांस तुम्ही प्रांत मजकुरीं कारकून व लोक पाठविले असतील ते माघारे उठवून नेणें.

१ फिरंगी गोवेंकर यांस कीं, तुम्हीं संस्थान मजकुरचे माहाल व देहे व किल्ले

---

162. After the death of Khemsavant Bhosle of Sansthan Wadi, his karkuns and Fond Savant Bhosle, represented to Goverument that there was much confusion in the Sansthan and teat it had suffered considerably and requested that Government should send an officer to restore order. Gunesh Chintaman Gharpure was therefore sent to make the necessary arrangement in the States. The Kolhapur Raja and the Portugese of Goa were requested to make over to Ganesh Chiutaman any vtllages or forts of the Sansthan that might be in their possession

A. D. 1809-1810.

NATIONAL ARCHIVES OF INDIA

व ठाणीं दाबिलीं असतील तीं जकरीरासुद्धां याचे हवालीं करावीं, व अयालत मर्तबानचे ऊर्फ तुम्हांकडील अमलांत बखेडखोर राहून प्रांतमजकुरीं उपद्रव करितात ते धरून याचे हवालीं करावें, व पुढें कोणेविसीं तुम्हांकडील उपद्रव मुलकांत न होय तें अमलांत आणावें म्हणोन. पत्र.

२ तालुके देवगड येथील मामलेदार व किल्ले सिंहगड येथील कारकून व गडकरी यांस कीं, तुम्हीं कोणे एकविसीं सरकार लक्ष धरून मशारनिल्हे सांगतील याचा पुस्तपन्हा करून तिकडील हरामखोर देवगड व सिंहगड तालुक्यांत राहिले असतील ते धरून याचे हवालीं करणें म्हणोन. पत्रें.

१ तालुके देवगड येथील मामलेदार नारो रामचंद्र यांस.

१ किल्ले सिंहगड येथील कारकून व गडकरी यांस. पत्र.

२

१ फोंड सांवत भोंसले व कारकून दिमत खेम सांवत भोसले यांस कीं, हे बंदोबस्त करतील, व येविसी करवीरकर व सिदोजी नाईक निंबाळकर सरलष्कर व गोवेकर फिरंगी यांस आलाहिदा पत्रें दिलीं आहेत, त्यांस तुम्ही घारपुरे यांस अनुकूल होऊन घारपुरे यांचे विचारें संस्थानचा व माहाल मुलुकाचा व किल्लेकोटाचा व आरमाराचा वगैरे बंदोबस्त झाल्याचें वर्तमान हुजूर लेहून पाठविणें. पुढें संस्थानचे व्यवस्थेविसीं आज्ञा करणें ते केली जाईल. म्हणोन पत्र.

१ जमीदार माहालानिहाय व मोकदम देहहाय यांस कीं, तुम्ही मशारनिल्हेचे रजातलबेत वर्तोन, प्रांत मजकूर वगैरे माहालानिहायचे गांवगन्नाचा अंमल घारपुरे यांचे इतल्यानें संस्थानाकडे सुरळीत देणें म्हणोन.

१ मोकदम देहें यांस सनद.

१ जमीदार माहालानिहाय यांस.

२ पत्र.

१ किल्ले व ठाणीं संस्थान वाडी येथील हवालदार व सरनोबत व सेनाधारी व कारकून यांस कीं हे किल्ले कोटाचा व माहाल मुद्दख वगैरे सुद्धां बंदोबस्त करितील. तरी तुम्हीं यांचे रजातलबेत वर्तोन सरकार लक्ष राखोन किल्ले व कोटाचा अलंग नोबत चौकी पाहारा यथास्थित करीत जाणे म्हणोन. सनद.

४ किल्ले पारगड वगैरे यांस कीं तुम्हीं सरकार कामाविसी मशार निल्हेस सामील होणें म्हणोन हवालदार वगैरे यांस पत्रें.

३ किल्लेहाय येथील हवालदार व सरनोबत व कारकून व गडकरी यांस पत्रें.

NATIONAL ARCHIVES OF INDIA

१ किल्ले पारगड.
१ किल्ले भिवगड.
१ किल्ले कलानिधि.
३

कारकून दिमत अनंदराव धुळप यांस कीं लोक सुद्धां सामील होणें ह्मणोन. पत्र.

४

१ बाबुराव अनंत लेले किल्ले बेळगांव यांस कीं तुम्हांस लिहितील त्याप्रमाणें सरकार लक्ष धरोन मशार निल्हेचा उपराळा राखीत जाणें. म्हणोन पत्र.

१४

येकूण चवदा सनदा व पत्रें दिलीं असेत रसानगी यादी.

राजकीय (ब) इतर माहिती.

परकीय संस्थानें.

जमा, जामदारखाना.

१६३।३२ कमावीस भेट राजश्री बाबासाहेब यांसी, बाबत रणबाहादर राजे नेपाळकर यांनीं पाठविले, ते गुजारत जानोजी जांभळा खिजमतगार. पद्दू भस्मी सनगें २. एकूण रुपये १५०.

इ० स० १७९६।९७. सबा तिसेन मया व अलफ. सवाल २९.

राजकीय (क) देशांतील बंडें.

भिल्ल व कोळी.

१६४।८ देवसिंग ठोके यांनीं भिल्लांस मिळोन महालांत दंगा केला याजमुळें किल्ले पट्टा येथें अटकेंत ठेवावयाविशीं पेशजी सनद सादर जाली आहे. त्यास फंद फितूर करूं नये तीन हजार रुपये खर्चास घेऊन सरकार लक्षोन वर्तणुक करीन ह्मणोन जामीन देतो. याप्रमाणें तुम्हांकडील कारकु

इ.स. १७९६।९७ सित तिसेन मया व अलफ रमजान ९.

A. D. 1796-97. 163. Present of clothes was received by Bajirao from Ran Bahadur Raja of Nepal.

164. Dewsing Toke having raised a rebellion with the assistance of Bhils was imprisoned at fort Patta. He was offered to give security
A. D. 1796-97. for abstaining from rebellion and for remaining loyal to Government. The offer was accepted and he was ordered to be set at liberty and was given an allowance of Rs 3000 a year for his expenses.

NATIONAL ARCHIVES OF INDIA

नांनीं विनंति केली. त्याजवरून ठोके याजपासून पक्काखातरजमेचा जामीन ध्यावयाची आज्ञा करून हे सनद सादर केली असे. तरी जामीन घेऊन मोकळे करणें आणि छत्रसिंगराव ठोके, विश्वासराव याजकडून सरंजामपैकीं तीन हजार रुपये देवसिंग यास खर्चास दरसाल देववीत जाणें. म्हणोन कृष्णराव गोविंद कमाविसदार प्रांत बागलाण यांचे नांवें.

सनद १.

रसानगी यादी.

१६५।१०२ महालानिहाय तळघांट व वरघाट प्रांत खानदेश, अहद कासारबारी, तहद अजंठा येथें भिल्लांचा उपद्रव आहे त्यांचे बंदोबस्ताचें काम पेशजी तुम्हांकडे सरकारांतून सांगितलें आहे त्याविशीं कलमें.

इ. स. १७९९।१८०० मया तैन व अलफ रमजान १५.

इस्तकाबिल सालगुदस्त सन तिसा तिसेन तागाईत सनसल्लास मया तैन पांच साला काम सांगोन कराराची यादी पेशजी करून दिली आहे. त्यास इमाने इतबारें वर्तोन भिल्लांचा बंदोबस्त चांगला करणें. करारप्रमाणें निभविलें जाईल. कलम १.

तुह्माकडे पागा व पथकें चाकरीस सरकारांतून पाठविलीं आहेत त्यांस भिल्लांचे बंदोबस्तास कारण लागल्यास ठेवणें.

कलम १

भिल्लपट्टीचा वगैरे ऐवज जमा होईल त्यापैकीं चौथाई ऐवज सरकारांत सालमजकुरापासून ध्यावयाचा ठरला आहे. त्यापैकीं तूर्त पांच हजार रुपये सरकारांत भरणा करून पावली याचा जबाब घेणें. कलम १

भिल्लपट्टीबद्दल दरसदे रुपये ५ पांचप्रमाणें ध्यावयाचे त्यास महाल लाऊन दिल्हे आहेत. ऐशास ज्या महालास व गांवास भिल्लांचा उपद्रव होत असेल त्यांचा बंदोबस्त केला सरंजामी वगैरे भिल्लपट्टीचे ऐवजाविशीं सरकारांतून मनाई मागो लागल्यास मनाई होऊं नये म्हणोन तुंह्मी विनंति केली. त्यास ज्या महालास व गांवास भिल्लांचा उपद्रव होत असेल त्यांजपासून जमाबंदीचे बेरजेस भिल्लपट्टीचा ऐवज दर शेकडारुपये ९ प्रमाणें घेत जाणें येविशी सरकारांतून मनाई होणार नाहीं बोभाटा आल्यास ताकीद केली जाईल.

कलम १

भिल्लाचे मिलाफी असतील त्यांचे पारिपत्य करून गुन्हेगारी घेतली असतां कोणी गैरवाका समजाऊन सरकारांतून मनाई मागो लागल्यास मनाई देऊं नये, म्हणोन तुम्ही विनंती केली. त्यास भिल्लांचे मिलाफी असतील त्यांची चौकशी करून त्यांजपासून गुन्हेगारी व जामीन घेऊन बंदोबस्त करणें, कोणी खटला केल्यास हुजूर समजावणें, समजोन आज्ञा करणें ती केली जाईल. कलम १

---

165. Dhondo Ram was entrusted with the duty of putting down the Bhils who were disturbing Khandesh from Kasarbari to Ajanta. He was authorized to levy 5 percent of the revenue from villages and Mahals suffering from the ravages of the Bhils and to pay ¼ of it to Government. Keeping the remaining amount for expenses.

A. D. 1799-1800.

NATIONAL ARCHIVES OF INDIA

असतां, तेथील ऐवजाची सरकारांतून मनाई जाहल्यास आमचा ऐवज खर्चामुळें फाजील होईल तो देविला पाहिजे. ह्मणोन तुह्मीं विनंती केली. त्यास भिल्लपट्टीचे ऐवजाचा ज़माखर्चाचा कच्चा हिशेब तफावत न करितां अखेरसालीं सालाचे सालांत सरकारांत समजावित जाणें. कलम १

पांच हजार रुपये चौथाई पैकीं तूर्त सरकारांत घ्यावयाचे करार केले आहेत. त्यांस व्याज भरण्याचे मित्तीपासून येकोत्रा शिरस्तेप्रमाणें व हुंडणावळ महाली चालीप्रमाणें मजुरा पडेल. कलम १

येकूण सात कलमें करार करून हे सनद तुह्मांस सादर केली असे, तरी सदरहूप्रमाणें वर्तणूक करणें ह्मणोन धोंडोराम याचें नांवें सनद १.

रसानगी यादी.

